cmyk

## संपादकीय

### घाबरू नका, दुष्परिणाम दुरापास्तच

कोरोना महामारीच्या काळात कोविशिल्ड लस जीवदान देणारी वाटत होती परंतु तीच लस तुमच्या जीवावर उठू शकते असे आता सांगितले जात आहे. हा सारा प्रकार धक्कादायक आहे. कोरोनावरील कोविशिल्ड लसीमुळे अतिशय दुर्मिळ प्रकरणांत रक्तामध्ये गुठळ्या होणे, प्लेटलेट्स कमी होणे यासारखे काही गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात, अशी कबुली ब्रिटिश औषध उत्पादक कंपनी अ‍ॅस्ट्राझेनेकाने ब्रिटनच्या न्यायालयात दिली आहे. रक्ताच्या गुठळ्या तयार होणे, प्लेटलेट्स कमी झाल्याने हृदयविकाराचा झटका, ब्रेनस्ट्रोकचा धोका निर्माण होऊन प्रसंगी मृत्यूदेखील ओढवू शकतो, अशी कबुली कंपनीने दिल्याने जगभरात खळबळ माजली आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पुंछमध्ये हवाई दलाच्या वाहन ताफ्यावर दहशतवादी हल्ला; पाच जवान जखमी

श्रीनगरः जम्मू-काश्मीरमधील पुंछमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा एकदा भ्याड हल्ला केला. सुरनकोटमध्ये दहशतवाद्यांनी हवाई दलाच्या वाहनाच्या ताफ्यावर गोळीबार केला. या हल्ल्यात पाच जवान जखमी झाल्याचे वृत्त समोर आले आहे. जखमी जवानांना उपचारासाठी उधमपूर येथील कमांड हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे. स्थानिक राष्ट्रीय रायफल्स युनिटने परिसराला घेराव घालून शोधमोहीम सुरू केली आहे. शाहसीतारजवळील जनरल परिसरात हवाई तळाच्या आत वाहने सुरक्षित करण्यात आली आहेत.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२४ | रविवार दि.५ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## सोमवारपासून पुन्हा पावसाचा अंदाज

### राज्यातील बहुतांशी भागात ऊन आणि उकाडा वाढण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

देशात उन्हाचा चटका चांगलाच वाढला आहे. देशातील अनेक भागात उष्णतेची लाट आहे. तर आंध्र प्रदेशातील नांद्याल येथे सर्वाधिक ४६.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हवामान विभागाने पुढील ५ दिवसांमध्ये काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला. तर काही ठिकाणी पावसाचा अंदाजही दिला आहे.

हवामान विभागाने पश्चिम बंगाल, ओडिशा, तमिळनाडू, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, कर्नाटक, छत्तीसगड, तेलंगणा, राजस्थान आणि पश्चिम मध्य प्रदेशातील काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला. तर गुजरात, कोकण आणि गोव्यासह देशभरात उष्ण

पान २ वर

# अखेर कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली

## तात्काळ आदेश लागू, ४० टक्के निर्यात शुल्क लावण्याचा निर्णय

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली आहे. तसेच कांद्यासाठी किमान निर्यात किंमत ४५ हजार आठशे रुपये प्रति मेट्रिक टन (५५० डॉलर) निश्चित करण्यात आली आहे. केंद्र सरकारचा हा आदेश शनिवारपासून लागू झाला असून, पुढील आदेशापर्यंत तो लागू राहील. तसेच कांदा निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावण्याचा निर्णयही**



**केंद्र सरकारने घेतला आहे. दरम्यान, डिसेंबर २०२३ मध्ये कांद्याचे भाव ८० रुपयांपर्यंत पोहोचले असताना सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती.**

या वर्षी कांद्याचे उत्पादन, सध्याची बाजारातील परिस्थिती, आंतरराष्ट्रीय उपलब्धता आणि सरासरीपेक्षा जास्त मान्सूनच्या अंदाजासारखे घटक विचारात घेऊन केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी हटवण्याचा निर्णय घेतला. डिसेंबर २०२३ मध्ये सरकारने ३१ मार्च २०२४ पर्यंत कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती.

### मतदान डोळ्यासमोर ठेवून निर्णय...

आता ७ मे ला लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या तर २० मेला चौथ्या टप्प्यासाठी मतदान होत आहे. यात नाशिक, अहमदनगर, सोलापूर, पुणे, जळगाव, धुळे यांचा समावेश आहे. जिथे मोठ्या प्रमाणावर कांदा उत्पादक आहेत. या पार्श्वभुमीवर सरकारने ही बंदी उठवली असल्याचे सांगण्यात येत आहे.

यानंतर गेल्या महिन्यातच सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी पुढील आदेशापर्यंत वाढवली होती. निर्यातबंदीमध्ये वाढ झाल्यापासून व्यापारी आणि शेतकरी विशेषतः महाराष्ट्रातील शेतकरी निर्यातबंदी हटविण्याची मागणी करत होते. यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळू शकतो.

पान २ वर

## प्रज्वल रेवण्णाविरोधात सीबीआय ब्लू कॉर्नर नोटीस जारी करणार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

कथित सेक्स स्कँडल प्रकरणी हसन लोकसभा मतदारसंघातील उमेदवार प्रज्वल रेवण्णा आणि त्यांचे वडील एचडी रेवण्णा यांच्यासाठी अडचणीत आणखी वाढ झाली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) प्रज्वल रेवण्णा यांच्याविरोधात 'ब्लू कॉर्नर नोटीस' काढण्याची शक्यता आहे. दरम्यान, एचडी रेवण्णा देश सोडून पळून जाण्याची शक्यता लक्षात घेता त्यांना लूकआउट नोटीस जारी करण्यात आली होती. या प्रकरणी सुमारे ७०० जणांनी राष्ट्रीय महिला आयोगाला खुले पत्र लिहून रेवण्णा यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

इंटरपोल वेबसाइटनुसार, ब्लू कॉर्नर नोटीस ही एक चौकशी नोटीस आहे. बेपत्ता झालेल्या संशयित आरोपीचा शोध घेण्यासाठी, ओळखण्यासाठी किंवा माहिती मिळविण्यासाठी ही नोटीस जारी केली जाते. गुन्हेगार ज्या देशात आहे त्या देशाला ब्लू कॉर्नर नोटीस जारी केली जाते आणि संशयिताचा इतर देशांत माग काढला जातो.

प्रज्वल यांचे महिलांसह आक्षेपार्ह स्थितीतील व्हिडीओ व्हायरल झाले. महिलांवर दबाव आणून त्यांचा लैंगिक छळ करण्यात आल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. पीडितांमध्ये काही शासकीय कर्मचारी असल्याचेही सांगण्यात येते. यानंतर कर्नाटक राज्य महिला आयोगाने २६ एप्रिल रोजी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली होती. विशेष तपास पथक नेमावे, असेही

पान २ वर

# नरेंद्र मोदी पंतप्रधान नव्हे तर आठवडा मंत्री

## शरद पवार यांचा टोला

**पुणे । प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने प्रचाराच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यातच २९ आणि ३० एप्रिल रोजी पंतप्रधान मोदी यांच्या ६ सभा पुणे, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर या मतदारसंघात पार पडल्या. यापार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. शरद पवार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आता पंतप्रधान राहिले नाहीत. तर ते आता आठवडा मंत्री झालेले आहेत. दर आठवड्याला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत असा टोला त्यांनी लगावला.**

शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, मध्यंतरी काहीजण म्हणाले की, माढ्याचे उमेदवार वयाने लहान आहेत त्यांच्या ठिकाणी ज्येष्ठ व्यक्ती असायला हवा होता. पण मी त्यांना सांगतो की, मी वयाच्या २६ वर्षी निवडणूकीला उभे राहुन विधानसभेत गेलो. वयाच्या २९ वर्षी मी मंत्री झालो. तर वयाच्या ३६ व्या वर्षी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झालो. त्यामुळे ज्याला लोकांसाठी काम करायचे आहे, तशी कोणाची जिद्द असेल आणि तसे करण्याचे कर्तृत्व असेल तर त्या





व्यक्तीला वय आडवे येत नाही. माढ्याच्या उमेदवाराच्या मागे तर राजकिय पार्श्वभूमी आहे असे सांगत पवारांनी टीकाकारांची तोंडे बंद करण्याचा प्रयत्न केला. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, पूर्वी आम्ही कधी तरी ऐकायचो की पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची कधी तरी सोलापूरात सभा आहे म्हणून. पंतप्रधान हे संपूर्ण देशाचे असतात, त्यामुळे त्यांचे येणे कधी तरीच व्हायचे. मात्र आताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोलापूर, पुणे, माळशिरस याची माहिती मिळाली त्यामुळे ते दर आठवड्याला इकडे येत आहेत. यामुळे ते पंतप्रधान नाही तर आठवडा मंत्री झाल्याचे ते म्हणाले. शेवटी शरद पवार म्हणाले की,

पान २ वर

## शांतिगिरी महाराजांचा उमेदवारी अर्ज बाद



**नाशिक । प्रतिनिधी**

**नाशिकमधून लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल केलेल्या शांतिगिरी महाराजांचा अर्ज बाद झाला आहे. त्यांच्यासोबतच नाशिकमधून एकूण ६ उमेदवारांचे अर्ज बाद झाले आहेत. तर दिंडोरीमधून ५ उमेदवारी अर्ज बाद झाले आहेत.**

शांतिगिरी महाराज, अनिल जाधव, भक्ती गोडसे यांनी पक्षाकडून दाखल केलेले अर्ज बाद झाले आहेत. यामध्ये शांतिगिरी महाराजांनी शिवसेनेकडून, अनिल जाधव यांनी भाजपकडून तर भक्ती गोडसे यांनी देखील शिवसेनेकडून अर्ज दाखल केला होता. एबी फॉर्म न जोडल्यामुळे पक्षाकडून दाखल केलेले अर्ज बाद करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. तर अपक्ष उमेदवारी मात्र कायम आहे. अर्ज छाननीत नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून एकूण ११ उमेदवारी अर्ज बाद झाले आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत २१ नाशिक लोकसभा मतदार संघात नामनिर्देशनपत्र छाननीत ३६ उमेदवारांची

पान २ वर

# विकासासाठी पंकजाताई मुंडे जिल्ह्याला आवश्यक-रमेश आडसकर

## सामान्य जनतेचा सुरः पंकजाताई मुंडेंसाठी रमेश आडसकरांचा घरोघरी जाऊन प्रचार

**माजलगाव । प्रतिनिधी**

**जिल्हा सर्वांगीण विकास करून जिल्ह्याला सुजलाम सुफलाम करण्यासाठी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केले.. आज पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या**



**नेत्यांनी माजलगाव मध्ये घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

बीड लोकसभा मतदारसंघातील भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस रिपाई रासप मनसे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज माजलगाव शहरांमध्ये महायुतीच्या नेत्यांनी भव्य पदयात्रा

पान २ वर

## मराठा आंदोलकांनी दानवेंना अडवले

संभाजीनगरः जालना लोकसभेचे महायुतीचे उमदेवार रावसाहेब दानवे यांना मराठा आंदोलकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. संभाजीनगरमधील पळशी गावात प्रचारासाठी रावसाहेब दानवे आले असता, मराठा आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी भाजप कार्यकर्ते आणि मराठा आंदोलक आमने सामने आले. दोन्ही बाजूने जोरदार घोषणाबाजी सुरू झाली.

## घराणेशाही संपवण्याचा एकदा निर्णय घ्या

### प्रकाश आंबेडकर यांचे आवाहन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

तरुणांच्या हाताला काम पाहिजे का? विभागाचा विकास झाला पाहिजे का? हे तुम्ही एकदा ठरवा. यासाठी तुमच्याकडे मोठे हत्यार आहे ते म्हणजे ही घराणेशाही संपवा आणि कार्यकर्त्यांमध्ये स्पर्धा लावा. घराणेशाही संपली की, पक्षातला कार्यकर्ता मग तो कोणत्याही पक्षाचा

पान २ वर



## बजरंग सोनवणे यांना निवडून आणणार !

### राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचा निर्धार



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाविकास आघाडी, इंडिया आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार), मित्र पक्षाचे बीड लोकसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांचे बर्दापूर जि.प.सर्कल तसेच अंबाजोगाई शहरात बळ वाढले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात - (शरदचंद्र पवार) अनेकांनी जाहीर प्रवेश केला आहे. पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्वांचे बीड जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांनी सहर्ष स्वागत केले. या तरूणांनी महाविकास आघाडीच्या बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (शरदचंद्र पवार) च्या वतीने जाहीर पक्ष प्रवेशाचे आयोजन अंबाजोगाई शहरातील डॉ.नरेंद्र काळे यांचे संपर्क कार्यालय येथे करण्यात आले होते. या प्रसंगी तालुक्यातील बर्दापूर सर्कल मधील माजी सरपंच, माजी उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांनी बीड जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, प्रदेश उपाध्यक्ष बबनराव गित्ते,

पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.४ मे २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१३.०० क्विंटल | २,२५० | २,३५० | २,३०२ |
| ज्वारी/हायब्रिड : ९०.०० क्विंटल | १,६७० | ३,३८१ | २,५४३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : २४.५० क्विंटल | ७,७१० | १०,६५१ | ९,८५१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरीः ३६.५० क्विंटल | २,३८१ | २,६५२ | २,५८२ |
| चिंच/लोकलः ४.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| सोयाबीनः ११४.०० क्विंटल | ४,४७५ | ४,५५० | ४,५०६ |
| हरभराः १.०० क्विंटल | ५,६०० | ५,६०० | ५,६०० |

# आरं जरा जपून..मला आमदार व्हायचयं रं!

## विधानसभेच्या संभाव्य उमेदवारांकडून कार्यकर्त्यांची विनवणी



**विशेष प्रतिनिधी । बीड**

**लोकसभेची रणधुमाळी सध्या जोरात सुरु असून बीडमध्ये मराठा विरुध्द ओबीसी असा जातीय रंग निवडणुकीला आला असल्याने विधानसभा मतदार संघातील संभाव्य उमेदवारांची चांगलीच पंचाईत झाली आहे. भाजप उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मराठा तरुणांकडून विरोध होत असल्याने त्या तरुणांना आरं जरा जपून..मला आमदार व्हायचयं..! तु जरा शांत राहा, पंकजाताईला मतदान करं, जातीय रंग कशाला देता, असा सल्ला सध्या प्रत्येक विधानसभा मतदार संघातील संभाव्य उमेदवार आपल्या कार्यकर्त्यांना देताना दिसत आहेत.**

बीड लोकसभा मतदार संघात यावेळी मोठ्या प्रमाणात जातीय रंग आला आहे. पंकजाताई मुंडे या वंजारी समाजातून येत असल्याने मराठा समाजातील तरुणांकडून त्यांना बऱ्याच वेळा विरोध करण्यात आला. आम्ही पंकजाताई मुंडे यांना मतदान करणार नाही, अशी भुमिका मराठा समाजातील बहुतांश तरुणांनी घेतली असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे महायुतीच्या गोटात चांगलीच खळबळ माजली आहे. विधानसभा क्षेत्रातील महायुतीच्या नेत्यांची यामुळे डोकेदुखी वाढली आहे. माजलगावात आ. प्रकाश सोळंके, रमेश आडसकर, मोहन जगताप, गेवराईत आ. लक्ष्मण पवार, अमरसिंह पंडीत, आष्टीत आ. सुरेश धस, आ. बाळासाहेब आजबे, बीडमध्ये राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, कुंडलिक खांडे या मराठा चेहऱ्यांची मोठी कोंडी झाली आहे. समाजाला सांगावे तर ते ऐकण्याच्या मुडमध्ये नसल्याचे दिसत आहे. तर आपापल्या मतदार संघात मताधिक्य कमी आले किंवा आलेच नाही तर या नेत्यांची विधानसभा निवडणुकीत पंचाईत होणार आहे. कारण महायुतीच्या नेत्यांनी अगोदरच सांगून टाकले आहे की, मताधिक्यावर विधानसभेची उमेदवारी असेल. त्यामुळे सध्या एका बाजूला मराठा समाजाचा महायुतीला विरोध होत असताना दुसरीकडे आपल्याच समाजातील तरुणांना समजावून सांगण्यात

पान २ वर

### नेत्यांनी कार्यकर्त्यांकडून घेतला शब्द

महायुतीतील सर्वच मराठा नेत्यांनी आता मनावर घेतले असून गेल्या १५ वर्षात केलेल्या विकासाच्या मुद्द्यावर सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, बाजार समिती संचालक, खरेदी विक्री संघाचे संचालक, पक्षाचे पदाधिकारी यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांनी आता पंकजाताई मुंडे यांच्या बाजूने मजबुत अशी भुमिका घेण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी तालुक्यातील सर्वच मराठा समाजाच्या नेत्यांनी आपल्या कार्यकर्त्यांकडे शब्द टाकला आणि तसा शब्दही घेतला असल्याचे म्हटले जात आहे.

cmyk

## अग्रलेख

# घाबरू नका, दुष्परिणाम दुरापास्तच

कोरोना महामारीच्या काळात कोविशिल्ड लस जीवदान देणारी वाटत होती परंतु तीच लस तुमच्या जीवावर उठू शकते असे आता सांगितले जात आहे. हा सारा प्रकार धक्कादायक आहे. कोरोनावरील कोविशिल्ड लसीमुळे अतिशय दुर्मिळ प्रकरणांत रक्तामध्ये गुठळ्या होणे, प्लेटलेट्स कमी होणे यासारखे काही गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात, अशी कबुली ब्रिटिश औषध उत्पादक कंपनी ॲस्ट्राझेनेकाने ब्रिटनच्या न्यायालयात दिली आहे. रक्ताच्या गुठळ्या तयार होणे, प्लेटलेट्स कमी झाल्याने हृदयविकाराचा झटका, ब्रेनस्ट्रोकचा धोका निर्माण होऊन प्रसंगी मृत्यूदेखील ओढवू शकतो, अशी कबुली कंपनीने दिल्याने जगभरात खळबळ माजली आहे. मात्र, हे दुष्परिणाम नेमक्या कोणत्या कारणामुळे होऊ शकतात ते सांगता येत नाही असेही कंपनीने म्हटले आहे. ॲस्ट्राझेनेका आणि ऑक्सफोर्ड विद्यापीठाने विकसित केलेल्या कोविशिल्ड लसीचे पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने उत्पादन केले होते आणि भारतातील कोरोना लसीकरण कार्यक्रमात या लसीचा सर्वाधिक वापर करण्यात आला होता.

ब्रिटिश न्यायालयात ॲस्ट्राझेनेकाविरोधात ५१ दावेदारांनी खटला दाखल करून सामूहिक कारवाईची मागणी केली होती. त्या खटल्याच्या संबंधात कंपनीने फेब्रुवारीमध्ये लंडन हायकोर्टात वरीलप्रमाणे दस्तावेज सादर केल्याचे वृत्त 'द डेली टेलिग्राफ'ने दिले आहे. ब्रिटनमध्ये ही लस ॲस्ट्राझेनेका 'वॅक्सझेव्हरिया' या नावाने तर भारतात 'कोविशिल्ड' या नावाने ओळखली गेली. या लसीमुळे क्वचित प्रसंगी टीटीएस (थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोमसह थ्रोम्बोसिस) आजार होऊ शकतो. याबरोबरच टीटीएस हा एझेड लसीच्या अभावानेही होऊ शकतो. खटला दाखल केलेल्या ५१ दावेदारांपैकी १२ जणांच्या नातेवाईकांचा लस घेतल्यानंतर मृत्यू झालेला आहे. कंपनीने म्हटले आहे की, आम्ही सर्व मानकांचे पालन केले आहे. ज्यांनी आपल्या कुटुंबीयांना गमावले त्यांच्याबद्दल आम्हाला संवेदना आहे. रुग्णांची सुरक्षितता ही आमची प्राथमिकता आहे. आमचे नियामक सर्व औषधे व लसींच्या सुरक्षित वापराच्या सर्व मानकांचे पालन करत आहोत. क्लिनिकल चाचण्या व अन्य देशातून मिळालेल्या डेटामधून हे सिद्ध झाले की, आमची लस सुरक्षेशी संबंधित सर्व मानकांचे पालन करते.

या लसीमुळे होणारे फायदे हे त्याच्या दुष्परिणामांपेक्षा अधिक आहेत. या लसीमुळे रक्तात गुठळ्या होऊन मृत्यू झाल्याची ८१ प्रकरणे आहेत. दुष्परिणामांचा त्रास झालेल्या पाचपैकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. भारतात कोविशिल्ड लसीचे १७५ कोटी डोस दिले गेले आहेत. ॲस्ट्राझेनेका कंपनीने इंग्लंडमधील न्यायालयात कबुली दिल्यानंतर त्याचे पडसाद भारतात उमटणे साहजिक होते. कोविशिल्ड लसीच्या दुष्परिणामांची तपासणी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती बनवण्याचे आदेश देण्यात यावेत, तसेच कोविशिल्डमुळे गंभीर आजार झाल्यास नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी करणारी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली. ॲड. विशाल तिवारी यांनी ही याचिका दाखल केली आहे. कोविशिल्ड लसीच्या कथित दुष्परिणामांविषयी केंद्र सरकारने त्वरित खुलासा करावा, अशी मागणी दिल्लीचे आरोग्यमंत्री सौरभ भारद्वाज यांनी केली. कोविशिल्डच्या सुरक्षेबद्दल शंका असल्यामुळे २०२१ च्या सुरुवातीला जर्मनी, फ्रान्स, स्पेन, फिनलँड, नॉर्वे आणि डेन्मार्क यांच्यासह अनेक युरोपीय देशांमध्ये त्यावर बंदी घातल्याचा दावाही त्यांनी केला. कोरोनावरील लसीचे दुष्परिणाम होऊ शकतात अशी चर्चा कोरोना महामारीच्या काळात जगभर मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे बरेच वादंग माजले होते. कोरोनाची लस घेतल्यानंतर काहींना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. मात्र, दुष्परिणाम होऊ शकतात हे कुणी मान्य करायलाच तयार नव्हते. या लसीच्या भारतीयांच्या आरोग्यावरील दुष्परिणामांसंबंधी हैदराबादच्या अपोलो हॉस्पिटलचे न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी म्हटले आहे की, लसीचे दुष्परिणाम शक्यतो लस घेतल्यानंतर एक ते सहा आठवड्यांदरम्यान दिसू शकतात. भारतीयांनी ही लस दोन वर्षांपूर्वी घेतली असल्याने त्यांना काळजीचे कारण नाही. समोर आलेले दुष्परिणाम हे पहिला डोस घेतल्यानंतर पहिल्याच महिन्यात दिसून आले आहेत, त्यानंतर नाही. भारतात लस घेतल्यानंतर टीटीएस झाल्याचे उदाहरण नाही. कोविड लसीमुळे टीटीएस होणे ही अति दुर्मिळ घटना आहे. कोरोनामुळे रक्ताच्या गुठळ्या, हृदयविकाराचा झटका येण्याची भीती असते. मात्र, लस घेतलेल्या व्यक्तींना हा धोका कमी असतो असे डॉ. राजीव जयदेवन यांनी म्हटले आहे.

भारतात कोरोना काळात सीरम इन्स्टिट्यूट निर्मित कोविशिल्ड आणि भारत बायोटेक कंपनी निर्मित कोव्हॅक्सिन या दोन लसी उपलब्ध होत्या. ॲस्ट्राझेनेका कंपनीच्या खुलाशानंतर भारत बायोटेक कंपनीने दावा केला आहे की, आमची कोव्हॅक्सिन लस ॲन्टी-कोरोना व्हायरस आहे. ही लस पूर्णपणे सुरक्षित आहे. ती घेतल्यास तिचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. ही लस बनवताना आमची पहिली प्राथमिकता लोकांच्या सुरक्षिततेला आणि दुसरी लसीच्या गुणवत्तेला होती. ॲस्ट्राझेनेकाच्या कबुलीच्या पार्श्वभूमीवर राज्य कोविड कृति दलाचे प्रमुख डॉ. रमण गंगाखेडकर म्हणाले, कोविशिल्ड लस घेतलेल्या नागरिकांनी घाबरू नये. कुठलीही लस अथवा औषधाचे दुष्परिणाम असतात. कोविशिल्डमुळे १० लाखांपैकी फक्त ८ जणांना दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे. या लसीचा पहिला डोस घेतल्यानंतर दुष्परिणाम जाणवण्याचा धोका जास्त होता. दुसऱ्या आणि तिसऱ्या डोसनंतर तो कमी होत गेला. कोविशिल्डमुळे मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे कोरोनापासून संरक्षण झाले आहे. भारत बायोटेकने जो दावा केला आहे, तो व्यावसायिकतेचा भाग म्हणावा लागेल. दुष्परिणामांसंबंधी म्हणाल तर ते तज्ज्ञच योग्य प्रकारे सांगू शकतील.

## प्रथमस्तरीय संगणकीकृत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया संपन्न

बीड । प्रतिनिधी

**प्रथमस्तरीय संगणकीकृत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया आज जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.**

यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते. यासह विविध राजकीय पक्षातील प्रतिनिधी यांच्यासमोर ही प्रक्रिया पार पाडण्यात आली. बीड लोकसभा मतदारसंघात ४१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे दोन बॅलेट युनिट अधिक लागणार आहेत. हे अधिकचे बॅलेट युनिट अकोला वरून २००० तर नांदेडहून ८०० आलेले आहेत. या बॅलेट युनिट मशीनची प्रथमस्तरीय तपासणी () आयोगाच्या अभियंतामार्फत २ मे पासून सुरू आहे. १० एप्रिल रोजी प्रथम सरमिसळ प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे विधानसभा निहाय मतदान मशीन पोहोचविण्यात आलेले आहेत. त्यातील उरलेले कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, आणि व्हीव्हीपॅट तसेच आता नांदेड व अकोला वरून आलेले बॅलेट युनिटचे आज सरमिसळ करण्यात आले. ५८५७ बॅलेट युनिट, ४९३ कंट्रोल युनिट, आणि ५१० व्हीव्हीपॅट येवढा मतदान यंत्राची आज सरमिसळ करण्यात आली.

## बीड लोकसभा निवडणूक मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षण

परळी । प्रतिनिधी

**बीड लोकसभा मतदार संघअंतर्गत परळी विधानसभा मतदार संघातील ३४२ मतदान केंद्राकरिता नियुक्त झालेले व मतदान केंद्रावर प्रत्यक्ष काम करणारे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना संपुर्ण मतदान प्रक्रिया याबाबतचे प्रशिक्षण हालगे गार्डन परळी वै येथे तर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत वर्गनिहाय प्रशिक्षण वैद्यनाथ महाविदयालय परळी या ठिकाणी यशस्वीपणे संपन्न झाले.यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, व्यंकटेश मुंडे तहसिलदार परळी वै, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर , अण्णा वंजारे यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी , मास्टर ट्रेनर तसेत मंडळ अधिकारी व महसूल विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.**



बीड लोकसभा मतदार संघ निवडणुक पार्श्वभूमीवर शनिवार दि ४ रोजी सर्व कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण संपन्न झाले.अधिकारी व कर्मचारी यांची संख्या लक्षात घेता कोणत्याही प्रकारचा विस्कळीतपणा न येता सुलभ पद्धतीने प्रशिक्षण संपन्न व्हावे यासाठी प्रशिक्षण सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात दोन ठिकाणी संपन्न झाले.सकाळच्या सत्रात व दुपार सत्रात १५१६ कर्मचारी यांना हे प्रशिक्षण स्वतंत्रपणे देण्यात आले. या प्रशिक्षणाची सुरुवात ही राष्ट्रगीताने करण्यात आली. माननीय जिल्हाधिकारी दीपा मुधोळ -मुंडे यांचा या प्रशिक्षणास उद्बोधन करणारा शुभेच्छा व मार्गदर्शन करणारा संदेश प्रथम दाखवण्यात आला. या प्रसंगी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी नियुक्त मतदान अधिकारी यांना ईव्हीम व साहित्य व विविध अहवाल याबाबतीत सविस्तर माहिती देऊन निवडणूकीचे कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच वाचन व पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले . यावेळी व्यंकटेश मुंडे तहसिलदार यांनी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना परळी विधावसभा मतदारसंघात होणारे मतदान साहित्य वितरण केंद्र व स्विकृती केंद्र व त्याचे नियोजन , मतदानाचे आदल्या दिवशी व मतदान दिवशी करावयाची महत्वाची कामे , ईव्हीम मॉक पोल, सिलींग , विविध घोषणापत्र , लिफाफे ईत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक नायब तहसिलदार मिलींद गायकवाड व बालाजी कचरे अवल कारकुन यांचे नियोजनाखाली सर्व झोनल अधिकारी व मास्टर ट्रेनर यांनी वैद्यनाथ महाविदयालय येथे खोलीनिहाय करण्यात आले . मतदान प्रक्रिया ही निष्पक्ष, पारदर्शक व खुल्या वातावरणात पार पाडण्यात सहाय करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडावे असे आवाहन केले. प्रशिक्षण सत्रांमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट मशीन याचे प्रात्यक्षिक पाहून मतदान यंत्रे स्वतः हाताळनी करून पहिली.या प्रशिक्षणाच्या प्रस्ताविकातून नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यांनी निकोप आणि आंनददायी वातावरणात राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊन गोपनीयता भंग होणार नाही याची खबरदारी घेण्याचे सांगितले. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सूरज शिंदे,धनराज भाडेकर महसूल सहाय्यक, पंकज दहातोंडे व मुसळे लिपिक नगर परिषद परळी, हरिशचंद्र चाटे व ईतर शिक्षक वसीम शेख, अनिल गवळी, दिगंबर शिनगारे महसूल सहाय्यक तसेच सर्व तलाठी , मंडळ अधिकारी, कोतवाल व शिपाई तहसील कार्यालय परळी यांनी परिश्रम घेतले.

## खर्च निरीक्षकांनी केली निवडणूक लेखांची तपासणी

बीड। प्रतिनिधी

**निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास यांनी आज निवडणुकीत उभे असलेल्या ३५ उमेदवारांच्या निवडणूक लेखांची तपासणी केली. गैरहजर असणाऱ्या उमेदवारांना नोटीस बजावण्यात येईल.**

दि.४, दि.८, व दि.१२ मे रोजी निवडणूक लेखांची तपासणी केली जाणार असून आज पहिल्या टप्प्यातील निवडणूक लेखांची तपासणी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आली. आज तपासणी झालेल्या उमेदवारांमध्ये अपक्ष उमेदवार अधिक होते. उमेदवारांनी आतापर्यंत केलेल्या खर्चाची पावतीची नोंद निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या नोंदवहीत निट घेतल्या आहे की नाही याची तपासणी स्वतः खर्च निरीक्षक श्री बिस्वास यांनी केली. यावेळी उमेदवारांनी निवडणुकीच्या काळात निवडणूक खर्चासाठी उघडलेले बँक खाते त्यात जमा झालेली आणि खर्च झालेली रक्कम याचा ताळमेळ बसतो



आहे का त्याची पाहणी करुन आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्याळी सुचविल्या. ज्या उमेदवारांनी अथवा प्रतिनिधींनी आज निवडणूक निरीक्षक यांच्यासमोर नोंदवही तपासून घेतली नाही त्यांना नोटीस बजावण्यात येईल. उमेदवारांकडून योग्य स्पष्टीकरण न आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे खर्च निरीक्षक यांनी सांगितले. पुढील तपासणी बुधवार दि.८ मे आणि रविवार दि.१२ मे रोजी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी १० ते सांय. ५ वाजेपर्यंत होणार आहे. ही तपासणी खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हेच करणार आहेत.

## पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राजकिशोर मोदी व सहकाऱ्यांनी संपूर्ण अंबाजोगाई शहर काढले पिंजून

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री मा ना अजितदादा पवार त्याचबरोबर राज्याचे कृषिमंत्री मा ना धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीच्या उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहराच्या प्रत्येक प्रभागातील कोपरा न कोपरा पिंजून काढत आहेत. आपल्या अनेक सहकाऱ्यांना त्याचबरोबर मित्रपक्षांतील देखील सहकर्यांना सोबत घेऊन शहरभर प्रचार करतांना दिसत आहेत.शहरातील अबाल वृद्ध तथा युवा पिढीकडून त्यांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. या प्रचारफेरी दरम्यान राजकिशोर मोदी यांच्या सोबत माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा,बबन लोमटे, महादेव आदमाने, खालेद चाऊस,किशोर परदेशी, भाजपचे माजी नगरसेवक कमलाकर कोपले, अनंत लोमटे, शरद कोपले, राहुल कोपले,शैलेश कुलकर्णी, तसेच माजी नगरसेवक धम्मा सरवदे, दिनेश भराडीया , संतोष शिनगारे, रुपेश चव्हाण,सुनील वाघाळकर , संजय कोंबडे, आनंद कर्णावट, तानाजी देशमुख, पंडित हुलगुंडे, बाळासाहेब आदमाणे, आशिष ढेले, बाबासाहेब गुंजाळ, गोविंद गुंजाळ, राहुल मुंडे, सुधाकर कुचेकर, बाळू गुंजाळ, दत्ता लोंढे, सय्यद मन्सूर, खदीर सय्यद, अंकुश आवाडे, रमेश गायसमुद्रे, सिध्दार्थ वाघमारे, शाकेर काझी यांच्यासह अनेक कार्यकर्ते तथा सहकारी या प्रचारफेरीत सहभागी झाले होते. अंबाजोगाई शहरातील राजीव गांधी चौक पतीसरातून वडार गल्ली, रायगड नगर,टिळक नगर, नागसेन नगर, एकात्मता कॉलनी, माऊली नगर, महात्मा फुले नगर , या भागासह सिद्धार्थ नगर, हमाल गल्ली, हावळे गल्ली, गुरुवार पेठ,गांधी नगर,गवळी पुरा, मिलिंद नगर,भोई गल्ली, मोची गल्ली, शिंपी गल्ली, सदर बाजार परिसर पिंजून काढला.

अंबाजोगाई शहर व येथील नागरिकांना पंकजा गोपीनाथ मुंडे यांचे आगामी काळातील व्हिजन तथा कामाची रूपरेषा लोकांसमोर ठेवत आहेत . त्यांनी बीड जिल्हा व जिल्ह्यातील तमाम नागरिकांसाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी कमळ या निशाणीचे बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन देखील प्रचार रॅली दरम्यान राजकिशोर मोदी त्यांचे सहकारी करतांना आढळून येत आहेत. बीड जिल्ह्याचे मागासलेपणाची तसेच ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी झालेली ओळख पुसून काढण्यासाठी पंकजाताई मुंडे यांनाच मतदान रुपी आशीर्वाद देण्याचा आग्रह देखील यादरम्यान करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा. ना. अजित पवार, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाई शहरात प्रचारफेरी दरम्यान पंकजा ताईंना मत म्हणजेच बीड जिल्ह्याच्या विकासाला मत असणार असल्याचे स्पष्टीकरण राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कडून करतांना दिसून येत आहे. या प्रचारफेरीस प्रत्येक भागातील महिलांचा देखील प्रतिसाद मोठ्या प्रमाणावर मिळत आहे. त्यामुळे पंकजा ताईंचाच विजय हा नक्कीच होणार असे स्पष्ट चित्र या मतदारांच्या सहभाग व प्रतिसादातून दिसून येत आहे. या रॅलीत जेष्ठ सहकारी सुभाष पाणकोळी, चंद्रकांत महामुनी, बबन पाणकोळी, सुधाकर टेकाळे,विशाल पोटभरे, विष्णू पांचाळ, भाई वजीर शेख, दत्ता हिरवे, तौसिफ शेख, जावेद गवळी, महेबूब गवळी, आकाश कऱ्हाड, रोशन लाड, महेश कदम, अस्लम शेख, कमलेश परदेशी, आतिष परदेशी, शरद काळे, अमोल मिसळ, संतोष चिमने, शेख मोईन फुलवाले, भारत जोगदंड, गौरव कसबे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

## पान १वरून...

### अखेर केंद्र सरकारने कांद्याच्या

ऑक्टोबरमध्ये देशभरात कांद्याचे भाव वेगाने वाढू लागले आणि अवघ्या आठवडाभरात ते दुप्पट झाले होते. त्यानंतर, ग्राहकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी सरकारने २७ ऑक्टोबरपासून राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) आणि नाफेडसारख्या सरकारी विक्री केंद्रांद्वारे २५ रुपये प्रति किलो दराने कांद्याची विक्री सुरू केली. दरम्यान, निर्यातबंदी असतानाही भारत शेजारील देशांना त्यांच्या अन्न सुरक्षेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कांदा पुरवठा करत होता. या संदर्भात भारताने बांगलादेश, यूएई, भूतान, बहरीन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा शेजारी देशांना ९९.१५० मेट्रिक टन कांदा निर्यात करण्यास परवानगी दिली होती. एप्रिल २०२४ पासून लासलगाव बाजारात कांद्याचे भाव १५ रुपये किलोच्या आसपास आहेत. कांद्याची साठवण हानी कमी करण्यासाठी, ग्राहक व्यवहार विभागाने मागील वर्षीच्या १२०० मेट्रिक टन वरून कोल्ड स्टोरेजचा साठा वाढवून यावर्षी ५००० मेट्रिक टन पेक्षा जास्त करण्याचा निर्णय घेतला.

### सोमवारपासून पुन्हा

तापमानासह उकाडा राहील असा अंदाज हवामान विभागाने दिला. याशिवाय कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यातील काही ठिकाणी उष्ण हवामान राहील तसेच उकाडाही जाणवेल असा अंदाज दिला. तर सोमवारपासून मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी पावसाचा अंदाजही दिला आहे.

हवामान विभागाने सोमवारी आणि मंगळवारी मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, नांदेड जिल्ह्यातील काही ठिकाणी तर विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदीया जिह्यातील काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. तर बुधवारी विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदीया तसेच सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील काही भागात वादळी पावसाचा अंदाज दिला.

### नरेंद्र मोदी पंतप्रधान नव्हे

आता आमची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एकच विनंती आहे की, यापुढे या भागात येताना हेलिकॉप्टर आणि विमानाने येऊ नये, रस्त्याने यावे जेणेकरून या भागातील रस्ते तरी चांगले होतील, असा खोचक टोला लगावत देशाच्या कोणत्याही राज्यात चांगला प्रकल्प आला की, नरेंद्र मोदी हे तो प्रकल्प गुजरातला घेऊन जातात. नरेंद्र मोदी हे कुठेही गेले तरी राहुल गांधी यांच्यावर टीका करतात, राहुल गांधीनी तुमचे काय घोडे मारलेय असा सवालही यावेळी पवारांनी उपस्थित केला.

### प्रज्वल रेवण्णाविरोधात सीबीआय

राज्य सरकारला सुचविले होते. त्यानंतर प्रकरणाच्या चौकशीसाठी कर्नाटक सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले. दरम्यान, प्रज्वल रेवन्ना यांचा सहभाग असलेल्या कथित सेक्स स्कँडल प्रकरणाची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या गुन्हे अन्वेषण विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक बी. के. सिंग यांच्या नेतृत्वाखालील एसआयटीकडे एफआयआर पाठवण्यात आला आहे. राष्ट्रीय महिला आयोगाने सोशल मीडियावर असंख्य आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. या व्हिडिओंमध्ये प्रज्वल रेवण्णा अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार करत असल्याचे दिसून आले आहे. प्रज्वल २६ एप्रिल रोजी कर्नाटकातील लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान झाल्यानंतर देश सोडून गेल्याचे समजते. यावरून महिला आयोगाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. प्रज्वल रेवण्णा हे हसन लोकसभा मतदारसंघातील एनडीएचे उमेदवार आहेत. येथे गेल्या शुक्रवारी मतदान पार पडले. काही आक्षेपार्ह व्हिडिओंवरून झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी प्रज्वल रेवण्णा यांना मधून निलंबित करण्यात आले आहे.

**एचडी रेवण्णा एसआयटीच्या ताब्यात**

जनता दल धर्मनिरपेक्ष (जेडी(एस) पक्षाचे नेते एचडी रेवण्णा यांना शनिवारी (दि. ४) कर्नाटक सरकारच्या विशेष तपास पथकातील (एसआयटी) अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे. बंगळुरू केआर नगर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या अपहरणाच्या गुन्ह्याच्या संदर्भात ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

### बजरंग सोनवणे

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), पदवीधर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा नेते अमोल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली २५ ते ३० प्रमुख कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (शरदचंद्र पवार) जाहीर प्रवेश केला. पक्षाच्या वतीने बीड जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांनी प्रवेश करणाऱ्या सर्वांचे स्वागत करून उपस्थितांना समायोचीत मार्गदर्शन केले. अमोल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये प्रवेश करणाऱ्या अनेकांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना, पक्ष नेतृत्वाच्या विश्वासाला आम्ही कदापीही तडा जाऊ देणार नाही. एकेकाळी चहा विकणारे मोदीजी जर देशाचे पंतप्रधान होऊ शकतात. तर एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा, शेतकरीपुत्र बजरंग मनोहर सोनवणे हे बीड जिल्ह्याचे खासदार नक्कीच होवू शकतात..! असे विचार मांडले. व विजयाचा निर्धार व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा (शरदचंद्र पवार) चे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाच्या वतीने राज्यातील प्रादेशिक पक्षांची केलेली पक्ष फोडाफोडी आणि महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या पैशाचा केलेला अपहार आणि अशाच नेत्यांना दिलेली क्लीन चीट तसेच भ्रष्ट व दर्जाहीन राजकारणाला सर्व जनता आता कंटाळली आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार आणि विद्यार्थी वर्गाला वेठीला धरले आहे. बेरोजगारी, महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे. शेतकऱ्यांनी पिकविलेल्या शेतीमालाला हमीभाव नाही, तपास यंत्रणांचा गैरवापर करून दबावतंत्र वापरून राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे पक्ष फोडून महायुती सत्तेवर आली आहे. बीड जिल्ह्यातील घराणेशाही, दडपशाही व दबावतंत्राच्या राजकारणाला यावेळी जनता कोणत्याही परिस्थितीत थारा देणार नाही. मी माझ्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन हा जिल्हा पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसमय (शरदचंद्र पवार) कसा करता येईल असे काम करणार आहे. त्यासाठी आपल्या सर्वांना मोठी मेहनत घ्यावी लागेल. माझ्यावर पवार साहेबांनी जो विश्वास दाखवून पक्षाचे कार्य करण्याचा आदेश दिला आहे. त्या आदेशाचे पालन प्रामाणिकपणे करण्याचा मी निर्धार केला आहे. असे चव्हाण यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्यात आम्ही बदल घडवून आणू असे सांगून तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करा.

### जिल्ह्याला विकासासाठी

काढून मतदारांशी थेट घरोघरी जाऊन संवाद साधला. पंकजाताई मुंडे या विकासाची दृष्टी असलेल्या नेत्या असून राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी केलेली काम आजही चर्चेला जात आहेत. पंकजाताई मुंडे यांनी जलजीवांच्या माध्यमातून मराठवाड्यात अनेक कामे करून पाणी पातळीमध्ये वाढ करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. ग्रामीण भागातही रस्त्याचे जाळे त्यांनी विणले असून विकासाची गती वाढवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना विजयी करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन रमेशराव आडसकर यांनी केले. महायुतीच्या नेत्यांनी आज माजलगांव येथे गजानन नगर, शाहु नगर,सिद्धी विनायक मंदिर, बायपास रोड आदी भागात भव्य पदयात्रा काढून मतदारांशी घरोघरी जाऊन संवाद साधला. यावेळी जाहीरनामा व पत्रकांचे वाटपही करण्यात आले. भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. प्रकाशराव आनंदगावकर, माजी नगराध्यक्ष डॉ. अशोकराव तिडके, अच्युतराव लाटे, अनंतराव शेंडगे, डॉ. प्रशांत पाटील, राहुल लंगडे, विनायक रत्नपारखी, सतिश जोशी, आनंद कुलकर्णी, बाबासाहेब आगे, दत्ता महाजन, वैभव मिटकरी, छबन घाडगे व भारतीय जनता पार्टी व महायुतीचे कार्यक्रते पदाधीकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घराणेशाही संपवण्याचा एकदा

असो, त्याला विश्वास संपादन करायचा असतो. त्यासाठी त्याला लोकांशी जुळवून घ्यायचे असते. त्यासाठी जनतेच्या प्रश्नासाठी लढावे लागते, आवाज उठवावा लागतो असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अहमदनगर येथील सभेत केले. वंचित बहुजन आघाडीच्या प्रचारार्थ आयोजित प्रचारसभेत प्रकाश आंबेडकर बोलत होते. ते म्हणाले, आमच्या नावाने खडे फोडले जातात, पण मतदार आमच्या बाजूने आहे. तो आम्हाला निवडून देणार याच्याबद्दल मनात शंका नसल्याचेही यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, जो मराठा समाज जरांगे पाटील यांच्यासोबत आहे, त्यांना यांनी उमेदवारी दिली नाही. श्रीमंत आणि घराणेशाहीतील, नात्यागोत्यात मराठा समाजाला उमेदवारी दिली आहे. आज घराणेशाहीत सत्ता आहे, याच्याशी तुमचा काय संबंध आहे. तुमचा संबंध फक्त मतदानादिवशी मतदान द्या, डाव्या किंवा उजव्या हाताला सत्ता द्या. मग ते म्हणतात याचे काय देणे घेणे आहे, पाच वर्षानंतर बघू असेही यावेळी बोलताना सांगितले. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मी रावेरमध्ये प्रचाराला होतो तिथे काही लोक म्हणाले एक हजाराला एक मत आहे. मी म्हणालो, तुम्ही नालायक आहात. तुम्ही तुमचे मत विकत द्यायला जात नाहीत, तुमचे मत तो विकत घ्यायला येतो. तो किंमत करतो. तुम्ही तुमच्या मताची किंमत करा आणि त्याला म्हणा की, एक लाखाला एक मत आहे देतो का? तुमच्यात एवढी ताकद नाही का? माझे मत मी एक लाखाला विकतो एवढी सांगायची? ज्यावर तुमचा अधिकार आहे, त्यावर सुद्धा अधिकार तुम्हाला सांगता येत नसेल तर गुलामीची परिस्थिती तुम्ही स्वतःच निर्माण करत असल्याची कानउघाडनीही यावेळी त्यांनी केली.

### आरं जरा जपून..मला

मराठा नेत्यांची चांगलीच दमछाक होताना दिसत आहे. आरं जरा जपून..मला आमदार व्हायचयं, शांत रहा, कसला जातीवाद आला रं, पंकजाताईला मतदान करायचयं, तुम्ही यड्यावानी करु नका, आमची पुढे विधानसभेला पंचाईत करुन टाकाल, अशा पध्दतीने अप्रत्यक्ष आपल्या कार्यकर्त्यांना विधानसभेचे संभाव्य उमेदवार समजावून सांगत आहेत. आपल्या नेत्यामुळे तरी मराठा समाजातील तरुण कार्यकर्ते जातीवाद सोडून नेत्याच्या हाकेला धावून जातील, जातीय समिकरणापेक्षा उमेदवार आणि विकासाच्या मुद्दयावर मतदान करतील, असे म्हटले जात आहे.

**शांतिगिरी महाराजांचा**

नामनिर्देशनपत्रे वैध ठरली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी जलज शर्मा यांनी दिली.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ५ मे २०२४ ३

# स्कुटीच्या डिकीतून तीन लाख रुपये चोरीस

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बँकेतून काढून डिकी मध्ये ठेवलेले तीन लाख रुपये दोन अनोळखी व्यक्तींनी चोरून नेल्याची घटना शहरातील प्रशांत नगर भागात दिनांक ३० एप्रिल रोजी घडली. अनिल नाथराव चव्हाण हे शेतकरी असून शहरातील प्रशांत नगर भागात वास्तव्यास आहेत. दिनांक ३० एप्रिल रोजी ते शहरातील आयडीबीआय बँकेत गेले होते. मित्राला उसने दिलेले ते पाच लाख पैसे परत मिळाल्याने स्वतःच्या खात्यावर जमा झाले होते. जमा झालेले पाच लाख रुपये खात्यावरून काढले. त्यातील दोन लाख रुपये खिशात ठेवले व तीन लाख रुपये स्कुटीच्या डिक्कित ठेवले. चोरांचे याकडे पूर्ण लक्ष होते. चोरांनी तात्काळ अनिल चव्हाण यांचा घरापर्यंत पाठलाग केला. दुर्दैवाने चव्हाण यांच्या गाडीची चावी गाडीलाच विसरून राहिली. चव्हण आत जाताच चोरांनी गाडीची डिकी उघडली व त्यात ठेवलेले तीन लाख रुपये हातो हात चोरी केले. अशी अशी माहिती तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधवर यांनी दिली. याप्रकरणी अज्ञात चोराविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# अनैतिक संबंधातून खून

## ट्रकखाली चिरडून अपघाताचा केला बनाव ;ट्रक जालन्यात

**केज । प्रतिनिधी**

अनैतिक संबंधातून एका व्यक्तीचा खून करून अपघाताचा बनाव केल्याप्रकरणी केज पोलिसांनी तीन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या अपघातात वापरलेला ट्रक जालना येथील औरंगाबाद चौफुली भागात असलेल्या एका खाजगी वाहन तळामध्ये आणून लावण्यात आला होता. त्यावेळी पासून हा ट्रक इथेच उभा होता. खुनाचा तपास पूर्ण झाल्यानंतर आज दिनांक चार रोजी या खाजगी वाहन तळामधून पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांनी हा ट्रक ताब्यात घेऊन केजला नेला आहे.

यासंदर्भात केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक २८ मार्च







२०२४ रोजी केज तालुक्यातील पिंपळगाव ते विडा रस्त्यावर एक अनोळखी व्यक्तीचा मृतदेह पडलेला दिसला .त्यानंतर हा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी दिनांक ३० मार्च रोजी रुग्णालयात असताना ओळख पटविण्यासाठी गप्पेवाडी येथील सखुबाई दत्तात्रय केदार या आल्या होत्या . त्यांनी या मृतदेहाची ओळख पटवली .दत्तात्रय केदार हे सखुबाई यांचे पती होते. ओळख पटल्यानंतर सखुबाईंनी घातपाताची शक्यता व्यक्त करत केज पोलीस ठाण्यामध्ये भादवि कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंदविला. या गुन्ह्याचा तपास पोलिसांनी सुरू केला पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांच्याकडे हा तपास देण्यात आला.

प्रथमदर्शनी घटनास्थळावर मृतदेह पाहिल्यानंतर हा अपघात असावा अशीच परिस्थिती होती आणि पोलिसांना देखील तसेच वाटले होते. परंतु सखुबाईने दिलेल्या तक्रारीनंतर या प्रकरणाचा पुन्हा तपास सुरू झाला. पोलिसांची दोन पथके तयार करण्यात आली आणि गोपनीय माहितीच्या आधारे या प्रकरणातील मुख्य आरोपी विलास उत्तम केदार, विकास मधुकर केदार व परमेश्वर धोंडीबा चौरे यांना धाराशिव जिल्ह्यातून ताब्यात घेतले आणि सखोल चौकशी केली असता या प्रकरणातील एका आरोपीच्या पत्नीचे आणि मृत दत्तात्रय केदार याचे अनैतिक संबंध होते. या संबंधामुळे वरील तिघांनी शांत डोक्याने कट रचला आणि दत्तात्रय केदार याला विश्वासात घेऊन एका निर्जन ठिकाणी बोलावले दारू पाजली आणि त्याला ठार मारले. अपघाताचा बनाव करण्यासाठी त्याच्या चेहऱ्यावरून ट्रक घातला त्यामुळे मृत केदार याचा चेहरा चेंदामेंदा झाला होता . ओळख देखील लवकर पटत नव्हती. केदार याचा मृतदेह ओळखायला येऊ नये म्हणून आरोपींनी पूर्ण काळजी घेतली होती परंतु सखुबाईने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने याची दखल घेऊन हा तपास लावला आहे. आरोपींना केज न्यायालयात उभे केले असता दिनांक सात पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# कपिलधारवाडीच्या दोन विद्यार्थीनी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील कपिलधारवाडी येथील इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेणारी रेणुका दादाराव शिंदे व भक्ती भारत शिंदे या दोन विद्यार्थीनी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्या आहेत.**






महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेसाठी जिल्हा परिषद कपिलधारवाडी शाळेचे विद्यार्थी बसले होते. त्यातील रेणुका आणि भक्ती यांनी यश संपादन केले आहे. शिष्यवृत्ती पात्रतेसाठी प्रत्येक पेपरला किमान ४० गुण मिळविणे अवश्यक आहे. भक्ती शिंदे आणि रेणुका शिंदे पात्र झाल्या आहेत. जिल्हा परिषद कपिलधारवाडी शाळेत जेव्हापासून मोईन सर आणि काळे सर आले आहेत. तेव्हापासून शाळेची प्रगती होत आहे. त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केल्याने आज कपिलधार वाडीच्या इतिहासात पहिल्यांदाच गावातील दोन मुली शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या आहेत. या यशाबद्दल दोन्ही मुलींचे शिक्षकांसह ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. शिक्षण क्षेत्रात यापुढेही जिल्हा परिषद कपिलधारवाडी शाळेचे विद्यार्थी विविध क्षेत्रात यशस्वी होतील असा विश्वास मोईन सर आणि काळे सर यांनी ग्रामस्थांना दिला.

# जवळा येथे हनुमान व विठ्ठल रुक्मिणी मंदिराची प्राणप्रतिष्ठा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे माहेरवासिनी लेकींनी पुढाकार घेत हनुमान व विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा कळस १ मे बुधवार रोजी बसवण्यात आला.सप्तधातूची २०, २० किलो कळसाची मंत्रोच्चारात स्थापना करण्यात आली.

हनुमान व विठ्ठल रुक्मिणी मंदिराची प्राणप्रतिष्ठा व कळसारोहन सोहळ्याचे आयोजन जवळा ग्रामस्थांनी बुधवारी केले होते. या सोहळ्यात संत नारायण बाबा संस्थान वांगी चे अध्यक्ष एकनाथ महाराज माने यांच्या कीर्तनाचे आयोजन बुधवारी दुपारी आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साहपूर्ण




**लेकींच्या पुढाकारातून मंदिराचे कळसारोहन सोहळा संपन्न**

वातावरणात हा भक्तीमय सोहळा साजरा करण्यात आला. अवघ्या जवळा नगरीत दिवसभर धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.ग्रामस्थ व रत्नदीप जवळेकर यांनी तीन दिवस यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते, हनुमान व विठ्ठल रुक्मिणी गणेश मूर्ती, महादेव पिंड, नंदी प्राणप्रतिष्ठा व कळसारोहण सोहळ्यानंतर जवळा व पंचक्रोशीतील भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले. उपस्थित सर्व लेकींचा गावकऱ्यांच्या वतीने साडीचोळी चा आहेर देत सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात ह.भ. प.एकनाथ महाराज माने, यांची प्रमुख उपस्थिती होती. मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळसारोहन सोहळ्याचे आयोजन समस्त जवळा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते.

# अंबाजोगाईत पंतप्रधानांच्या सभेमुळे वाहतूक मार्गात मोठा बदल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७ मे रोजी अंबाजोगाईत बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारात जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा अंबाजोगाई-बीड रोडवरील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर होत आहे. त्यामुळे या मुख्य रस्त्यावरील वाहतुक इतर रस्त्यांनी वळविण्यात आली आहे. पंतप्रधानांच्या सभेमुळे वाहतुक मार्गात मोठे बदल करण्यात आले आहे.

सध्या वापरात असलेला बीड-केज-लोखंडी सावरगाव - टिपॉईंट- पाण्याची टाकी- यशवंतराव चव्हाण चौक- अंबाजोगाई-परळी या मार्गासाठी पर्यायी रस्ता म्हणून लोखंडी सावरगाव टी-पॉईंट- वाळाघा साखर कारखाना - वाघाळा रोड बायपास अंबाजोगाई - भगवानबाबा चौक हा मार्ग पर्यायी रस्ता म्हणून देण्यात आला आहे. तर परळी - अंबाजोगाई- यशवंतराव चव्हाण चौक - लोखंडी सावरगाव-केज-बीड या रोडवरील वाहनांसाठी भगवानबाबा चौक अंबाजोगाई- तथागत चौक पोखरी रोड वाघाळा- कारखाना - लोखंडी सावरगाव या मार्गे पर्यायी रस्ता देण्यात आला आहे. तर लातूर-अंबाजोगाई-परळी या सध्या वापरात असलेल्या मार्गासाठी लातूर- पोखरी-तथागत चौक - अंबाजोगाई येथील भगवानबाबा चौक येथून पर्यायी रस्ता देण्यात आला आहे. परळी-अंबाजोगाई-लातूर या सध्या वापरात असलेल्या मार्गासाठी अंबाजोगाई येथील भगवानबाबा चौक -तथागत चौक-पोखरी हा पर्यायी रस्ता देण्यात आला आहे. अशी माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांनी एका पत्रकाद्वारे प्रसिद्धीस दिले आहे.

# रांगोळीच्या माध्यमातून मतदान जानजागृती ; अंबाजोगाई नगर परिषदेचा उपक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विविध प्रकारच्या आकर्षक व कलात्मक रांगोळ्या साकारून अंबाजोगाई शहरातील महिलांनी रांगोळीच्या माध्यमातून मतदानाबाबत मतदारांमध्ये जनजागृती केली. अंबाजोगाई नगर परिषदेने केलेल्या या नविन उपक्रमाच्या माध्यमातून ही अनोखी जनजागृती शहरवासीयांसाठी चर्चेचा विषय ठरला आहे.

अंबाजोगाई नगर परिषदेचे मुख्याधिकारी उत्कृर्ष गुट्टे, स्वच्छता निरिक्षक अनंत वेडे, बचतगटाचे प्रमुख दिलीप तांबारे यांनी नगर परिषद व दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातर्गंत मतदान जनजागृती रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा नगर परिषदेच्या उद्यानात घेण्यात आली. यावेळी महिलांनी विविध प्रकारच्या




आकर्षक कलाकृती रांगोळीच्या माध्यमातून साकारल्या. यावेळी स्पर्धेतील विजेत्या महिलांना बक्षीसाचे वाटप मुख्याधिकारी उत्कृर्ष गुट्टे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या आकर्षक रांगोळीने शहरवासियांचे लक्ष वेधले होते.

# कितीही वादळे आली तरी न डगमगता ध्येय गाठणारे फिनिक्स म्हणजे ॲड. सुभाष राऊत - पंकज भुजबळ

**बीड । प्रतिनिधी**

माणसाच्या आयुष्यात संकटे येत असतात परंतु या संकटांना न घाबरता त्यांच्या सामोरे जाऊन यश मिळविणाराच या जगामध्ये आपले ध्येय गाठू शकतो. समता परिषदेचे एकनिष्ठ सुभाष राऊत यांच्यासमोर देखील अनेक संकट आली, वादळे आली मात्र या वादळांचा सामना करून त्यांनी पुन्हा फिनिक्स भरारी घेतली आहे. त्यांच्या व्यवसायात आणि आयुष्यात ही फिनिक्स भरारी कायम राहो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो असे प्रतिपादन माजी आ. पंकजभाऊ भुजबळ यांनी केले आहे.

सन २०१८ मध्ये बीड जिल्ह्याच्या वैभवात भर टाकणारे हॉटेल सनराईज एक्झिक्यूटिव्ह ॲड. सुभाष राऊत यांनी धुळे - सोलापूर हायवेवर जालना रोडवरील नामलगाव फाटा नजीक उभारले होते. मात्र ३० ऑक्टोबर २०२३ रोजी काही माथेफिरूनी या वास्तूचे नुकसान करून होत्याचे नव्हते केले होते. मात्र आलेल्या या वादळाला न डगमगता अवघ्या पाच महिन्यांमध्ये हॉटेल सनराइज एक्झिक्युटिव्हचे पुन्हा नव्या ढंगात..... नव्या रंगात उभारणी करून बीडकरांच्या सेवेत पुन: उभारणी सोहळा महाराष्ट्र दिनी दि. १ मे २०२४






रोजी माजी आ. पंकजभाऊ भुजबळ आणि ॲड. सुभाष राऊत यांच्या मातोश्री शशिकलाबाई किसनराव राऊत यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी माजी आ. पंकजभाऊ भुजबळ बोलत होते.

या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक, इतिहास संशोधक तथा नाटककार डॉ. सतीश साळुंके, समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत, विभागीय अध्यक्ष प्रितेश गवळी पुणे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ खरात, जालना जिल्हाध्यक्ष मधुकर झरेकर, पाथरी येथील नगरसेवक गोविंद हळकर, बीडचे माजी नगरसेवक सुभाष सपकाळ, परीट समाज संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक ॲड. संदीप बेदरे, धनगर समाज कर्मचारी महासंघाचे नेते प्रा. अंकुश निर्मळ, दै. प्रजापत्राचे कार्यकारी संपादक संजय मालानी, युवा नेते अमर ढोणे, माळी महासंघाचे विश्वस्त प्रा. लक्ष्मण गुंजाळ, बंजारा समाजाचे नेते प्रा. पी . टी. चव्हाण, ओबीसी समाजाचे नेते जे. डी. शहा यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना माजी आ. पंकजभाऊ भुजबळ म्हणाले की, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचा सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रसार होण्यासाठी समता परिषदेची स्थापना केलेली असून छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारावर चालणारी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची स्थापना संस्थापक अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ यांनी केली असून कितीही संकटे आली तरी सत्याची बाजू सोडायची नाही आणि वाईटाचा विजय होऊ द्यायचा नाही हा ना. छगनराव भुजबळ यांचा विचार तंतोतंत राबवून ॲड. सुभाष राऊत यांचे कार्य नेहमीच सुरू असते त्यामुळे ते ना. छगनराव भुजबळ यांच्या अत्यंत जवळचे कार्यकर्ते आणि स्नेही आहेत. त्यांनी घेतलेल्या फिनिक्स भरारीला ईश्वराची साथ लाभो अशी प्रार्थना देखील त्यांनी यावेळी केली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. सुभाष राऊत यांनी करून हॉटेलच्या उभारणीपासून ते पुन: उभारणी पर्यंतचा इतिहास प्रास्ताविकात मांडताना समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्यामुळेच कार्य करण्याची प्रेरणा मिळत असून त्यांच्या आशीर्वादामुळेच हॉटेल सनराईज एक्झिक्युटिव्हचा पुन: उभारणी सोहळा होत असल्याबाबतची प्रेरणा व्यक्त केली. याप्रसंगी डॉ. सतीश साळुंके, संजय मालानी, प्रितेश गवळी आदींची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय शेरकर यांनी तर आभार प्रदर्शन ॲड. संदीप बेदरे यांनी केले. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील समता परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार डॉक्टर्स, वकील, सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

## आष्टी येथे होणाऱ्या

बीड व परळी पर्यंत कधी धावणार? का निवडणूक आली की रेल्वेचे गाजर दाखविले जाते. केंद्र सरकारच्या आरोग्यासाठी असलेल्या अनेक योजनांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे रुग्णांची हॉस्पिटलमध्ये होणारे लूट होत आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी आहे. केंद्र व राज्य सरकारमध्ये समन्वय नसल्यामुळे सर्वसामान्य जनतेला कोणताही लाभ मिळत नाही. सध्या आष्टीचे तिन्ही आजी माजी आमदार विकासासाठी एकाच बाजूने असले तरी विकासाची गंगा कागदावरच असल्याचे दिसून येते. त्यामुळे आष्टी मतदार संघाचा विकास करण्यासाठी बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब ,भूषणसिंह राजे होळकर यांची आष्टी येथे सोमवारी सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार आहे. या सभेस उपस्थित. महेबूब शेख आ.संदीप क्षीरसागर. जीवनराव गोरे. मा.आ सय्यद सलीम. मा आ साहेबराव दरेकर,,मा आ उषा दराडे, मा आ पुर्थ्वीराज साठे,मा आ बदामराव पंडित, मा आ राजेंद्र जगताप, सुशीला मोराळे,बबन गिते, शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा), परमेश्वर सातपुते, अण्णासाहेब चौधरी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, रवि ढोबळे, मिलींद आव्हाड मानव हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष , ऑल इंडीया पँथर दिपक भाई केदार , डेमोक्ट्रीक पार्टी चे प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांगणे,अहमद पठाण ॲड.किशोर मुळे, , सुनील नाथ, अमोल तरटे, आप चे अशोक येडे, ऑल इंडिया पँथर जिल्हा अध्यक्ष तसेच आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पद अधिकारी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राम खाडे यांनी केले आहे.

## अण्णाभाऊ साठे यांना

डीपीआयचे जिल्हाध्यक्ष अमोल शेरकर, सुभाष लोणके, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष उषा चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष केशव लोंढे यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, मी बीड लोकसभेचा खासदार म्हणून निवडून येणार असून माझ्या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असताना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी संसदेच्या सभागृहात करीन. त्यासाठी मला प्रसंगी खासदारकी पणाला लावायची वेळ आली तरी बेहत्तर पण मागे हटणार असे आश्वासन त्यांनी देताच कार्यकर्त्यांनी टाळ्यांचा कडकडाट करीत प्रतिसाद दिला. भाजप व त्यांचे लोकसभेच्या उमेदवार हे संविधान बदलण्याची भाषा करीत आहे. परंतु आम्ही ते सहन करणार नाही. त्याला परखरतेने विरोध करून संविधान बदलण्याचा कुटील डाव हाणून पाडू. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सामान्य घटकाला संविधानद्वारे न्याय, हकक अबाधित ठेवण्यासाठी सर्वांना त्यांचे हक्क मिळवून दिले आहेत. याचाही उल्लेख त्यांनी भाषणात केला. दरम्यान, आता लोकसभा निवडणुकीत डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते सक्रिय झाले असल्याने बजरंग सोनवणे यांची ताकद वाढली आहे. त्याचा धसका भाजपने घेतला आहे.

## पंकजाताई मुंडे यांना साथ देत

धनगर समाज समाजाला येणाऱ्या १३ मे रोजी कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून पंकजा मुंडे यांना प्रचंड मतांनी विजय करावे असे आवाहन केले.यावेळी उपनगराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, प्रदीप नेअरकर , रंणजीत रुपनर,बिभिषण शेंडगे, वैजैनाथ नरवटे, महेश कोळेकर, प्रकाश खांडेकर,प्रकाश वाघमारे, शिंदे वाडीचे सरपंच बाळासाहेब शिंदे,माजी सरपंच विष्णू शेळके, लक्ष्मण शिंदे, पांडुरंग शिंदे ,रामभाऊ करे ,लक्ष्मण शिंदे, पै.लक्ष्मण करे,सुग्रीव पांढरे,बाबा राजे करे, बालासाहेब कोकरे,मल्हारी करे,गणेश करे, धर्मराज व्हरकटे, महादेव गडदे, सोदागर शेंडगे, लक्ष्मण शेंडगे, दिपक शिंदे, तिन्ही गावातील ज्येष्ठ नागरिक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंकजाताईंच्या

आपण एका वर्षात नदीवरचे बँरेजेस पूर्ण करू तसा शब्द पंकजाताईने देखील दिला. पंकजाताई मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्यात तुलना होऊ शकत नाही. आपल्या समोर अनेक वेगवेगळे प्रश्न असले तरी, माझ्या वायक्तिक स्वार्थासाठी निर्णय घेतला नाही. कारण विकास हाच माझ्यासाठी महत्वाचा मुद्दा वाटतो. भावनेच्या भरात राजकीय गडबड करू नका अस सांगताना पंकजाताईने विकासाच्या प्रश्नावर दिलेला शब्द वाया जाणार नाही. गावागावातून तुम्ही सहकार्य करा. पंकजाताई तथा कमळाला मतदान केलेल फुकट जाणार नाही. विश्वास मी देतो. तुम्ही सांगता देशात भाजप सत्तेवर येणार, तर मग आपण आपल्या विकासाच्या मतलबासाठी सोबत गेलो तर उत्कर्ष झाल्याशिवाय राहणार नाही. बैठकीत त्यांनी हात जोडून ग्रामस्थांना विनंती केली. बजरंग सोनवणे यांच्यात पंकजाताई एवढी क्षमता नाही. पालकमंत्री असताना आम्ही त्यांचे काम पाहिले. विकासाच्या प्रश्नावर जाती पातीचे राजकारण त्यांनी कधी केले नाही. त्यांच्या नेतृत्वात विकासाचे व्हीजन आहे. सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांची भूमिका असते. सर्व समावेशक स्वभाव असल्याने आपण त्यांना शब्द दिला. तो खरा करूनच दाखवू हा संकल्प त्यांनी केला. दिवसभरात एकूण आठ बैठका, प्रत्येक बैठकीला दोनशे पेक्षा जास्त प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## विकासात्मक नेतृत्व असलेल्या

ग्रामीण विकास मंत्री असताना संपूर्ण जिल्ह्यात गाव, वाड्या, वस्त्या येथे चांगले रस्ते निर्माण केले आहेत तसेच जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाचे अनेक कामे त्याचबरोबर असंख्य ग्राम सचिव भवन,ग्रामपंचायत इमारती बांधकामे,घरकुले केली आहेत, नगर- बीड -परळी हा रेल्वे मार्ग लवकरात लवकर पूर्ण करावयाचा आहे. त्यामुळे अशा विकासात्मक नेतृत्व असलेल्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना लोकसभेत प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहनही त्यांनी केले. अंमळनेर जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच गटातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटी चेअरमन, आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आण्णांच्या नेतृत्वाखाली पंकजाताई

आण्णांच्या नेतृत्वाखाली पंकजाताई मुंडेना मताधिक्य मिळवून देण्यासाठी कामाला लागा असे आवाहन युवानेते शिवराज पवार यांनी केले आहे महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार मा.मंत्री पंकजाताई मुंढे यांच्या प्रचारार्थ आज दि.०३/०५/२४ वार शुक्रवार रोजी सकाळी १०:३० वाजता युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत तलवाडा जी.प.गटातील बूथ प्रमुख,सुपर वारियार्स, शक्ती प्रमुख यांची बैठक संपन्न झाली. यावेळी गेवराई भाजपा तालुका अध्यक्ष श्री.प्रकाश(काका) सुरवसे मा.जी.प सदस्य श्री. सुरेशरावजी हात्ते,शाम(आबा)कुंड निवडणूक प्रमुख, विस्तारक ईश्वर पवार, राजेंद्रसर,समाधान(जिजा)मस्के,सचिन वावरे,गौरव भैय्या खरात कृष्णा (भैया) पाटोळे विठ्ठल हात्ते,अभिजित मरकड सतीश चव्हाण दीपक शेलार यांच्यासह सर्व बूथ प्रमुख,शक्ती प्रमुख,सरपंच,भाजपा पदाधिकारी नागरिक यांची उपस्थित होती.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.५ मे २०२४
४

# निर्यातबंदी हटवली, पण प्रत्यक्षात कांद्याची निर्यात होणार का?

## अजित नवलेंनी सांगितला डावपेच

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कांदा उत्पादकांमधील रोष कमी करण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याची निर्यातबंदी उठवण्याची घोषणा केलीय. मात्र, प्रत्यक्षात अटी शर्ती लागू करण्यात आल्या आहेत. सरकारने कांद्याची निर्यात होणार नाही अशाप्रकारे डावपेच करण्यात आल्याची टीका किसान सभेचे नेते डॉ. अजित नवलेंनी केलीय. सरकारनं निर्णय घेताना घातलेल्या अटी शर्तीमुळं शेतकऱ्यांना फायदा होणार नसल्याचे अजित नवले म्हणाले.

नेमके डावपेच काय? : कांद्याच्या निर्यातीसाठी प्रति टन ५५० डॉलर किमान निर्यात मूल्य आणि ४० टक्के निर्यात शुल्क लागू करण्यात आले आहे. यामुळं भारतीय कांदा निर्यात करताना त्याचे शुल्क ६४ रुपये प्रति किलो पर्यंत जाणार आहे. निर्यातीचा खर्च पाहता संबंधित देशात भारतीय कांदा पोहचेल तेव्हा त्याची किंमत ७० ते ७५ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचणार आहे. संबंधित देशात ३० रुपये ते ५० रुपये प्रति किलोप्रमाणे कांदा उपलब्ध आहे. त्यामुळं ७० ते ७५ रुपये प्रतिकिलो किमतीचा भारतीय कांदा तेथे कुणी घेणार नाही. परिणामी निर्यातबंदी उठवली असली तरी प्रत्यक्षात





कांद्याची निर्यात होणार नाही असे अजित नवले म्हणाले.

सरकारनं कांद्याची निर्यातबंदी पूर्णपणे उठवून विनाअट निर्यातीसाठी प्रोत्साहन द्यावं : केंद्र सरकारचा अटी शर्तींचा हा खेळ शेतकरी विरोधी असल्याचे अजित नवले म्हणाले. एकीकडे दिल्यासारखं करायचं दुसरीकडे मात्र अटी शर्ती लागू करुन शेतकऱ्यांना कोणताही दिलासा मिळणार नाही यासाठी डावपेच करायचे, अशा प्रकारची कृती केंद्र सरकारने केली असल्याचे मत अजित नवलेंनी व्यक्त केलं आहे. केंद्र सरकारने अटी शर्तींचे हे डावपेच थांबवावेत व कांद्याची निर्यात बंदी संपूर्णपणे उठवून विनाअट कांदा निर्यातीसाठी प्रोत्साहन द्यावे अशी मागणी किसान सभेच्या वतीने अजित नवले यांनी केली आहे.

### शेतकरी संघटना आक्रमक

केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवण्याचा निर्णय घेतलाय. डिसेंबर २०२३ मध्ये सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ही बंदी मार्च २०२४ पर्यंत असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, जोपर्यंत सरकार पुढील आदेश देत नाही तोपर्यंत बंदी उठणार नाही असं सरकारच्या वतीनं मार्चमध्ये सांगण्यात आलं होतं. अखेर आज कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठली आहे. मात्र, सरकारनं कांदा निर्यातीसाठी प्रति टन ५५० डॉलर किमान निर्यात मूल्य आकारले आहे. त्यामुळं शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. विना अटी आणि शर्तीसह कांदा निर्यात सुरु करावी अशी मागणी त्यांनी केलीय.

# राईस मिलर्स संघटनेने केली धान्य भरडाई बंद



## २४ लाख क्विंटल धान्य खराब होण्याची शक्यता!

गोंदिया : गोंदिया राईस मिलर्स संघटनेने त्यांच्या विविध मागण्यांसाठी धान्य भरडाई बंद केली असून, यामुळे २४ लाख क्विंटल धान्य खराब होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महाराष्ट्रातील 'धान्याचे कोठार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोंदिया जिल्ह्यात सध्या वेगळीच परिस्थिती आहे. राईस मिलर्स संघटनेच्या या बंदीमुळे धान्य खराब होण्याची शक्यता आहे, कारण गेल्या सहा महिन्यांपासून खरेदी केलेले हे धान्य आता उघड्यावर आणि गोदामात पडून आहे. जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडे धान्य साठवण्याची जागा नसल्याने नवीन धान्य खरेदी करण्यास अडचण निर्माण होत आहे. २०२३-२४ मध्ये, १ लाख २५ हजार १२९ शेतकर्यांनी ऑनलाइन नोंदणी केली त्यातील ८० हजार ८०६ शेतकऱ्यांनी २४ लाख ७७ हजार ९९६ क्विंटल धान्य विकले होते. यासाठी ५४० कोटी ९४ लाख ५३ हजार ७६ रुपये शेतकर्यांना दिले गेले आहेत.

राईस मिलर्सच्या मागण्या : १५० रुपये प्रति क्विंटल भरडाई दर, हमाली दर आणि वाहतूक दरात वाढ यासह इतर मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत धान्य भरडाई बंद ठेवण्याचा निर्णय राईस मिलर्स संघटनेने घेतला आहे.

पणन विभागाचे काय म्हणणे? : २ मे २०२४ पर्यंत ३३ राईस मिलर्सनी भरडाई सुरू न केल्याने त्यांना काळ्या यादीत टाकून करार रद्द करण्याचे आणि जप्त करण्याचे आदेश अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने दिले आहेत. परंतु राईस मिलर्स मागे हटण्यास तयार नाहीत. या समस्येवर तोडगा काय निघेल याकडे सर्वांचे लक्ष आहे. शेतकर्यांच्या धान्याचे काय होईल याची चिंता वाढत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या समस्येचा राजकीय वाद होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# शेतकऱ्यांनो, मेंढीपालन सुरू करुन लाखो रुपये कमवा

भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथील बहुतांश लोक शेती व संबंधित कामांवर अवलंबून आहेत. देशातील अनेक भागात विविध प्रजातींचे प्राणी पाळले जातात. ज्यामध्ये गाय, म्हशीपासून शेळी, उंट यांचा समावेश होतो. दुग्धव्यवसायासाठी या प्राण्यांचे संगोपन केले जाते. पण असाही एक प्राणी आहे जो दुधासाठी नाही तर लोकर मिळवण्यासाठी पाळला जातो.

देशातील अनेक भागात मेंढ्या पाळल्या जातात त्यामुळे एक पंत दोन पंत होतात. मेंढीपालनातून दूध तसेच लोकर मिळते.भारतातील बहुतांश भागात मेंढीपालन केले जाते. जेव्हा तुम्ही मेंढीपालन सुरू करता तेव्हा तुम्ही मेंढ्यांच्या सुधारित प्रजाती निवडाव्यात,




जेणेकरून तुम्हाला अधिक दूध आणि लोकर मिळू शकेल. मालपुरा, जैसलमेरी, मंडिया, मारवाडी, बिकानेरी, मारिनो, कॉर्डिलेरा माबुटू, छोटा नागपुरी आणि शहाबाद या भारतातील मेंढ्यांच्या जातीचे उत्पन्न मिळवते. मेंढीपालनातून चांगले पैसे कमवायचे असतील तर त्यांच्या स्वच्छतेकडे आणि आरोग्याकडे पूर्ण लक्ष दिले पाहिजे. जेव्हा त्यांच्या खाण्यापिण्याचा प्रश्न येतो. हा कचरा शेतात खत म्हणून वापरला जातो. कळपातील मेंढ्यांना चरायला व बाहेरगावी नेले पाहिजे. मेंढ्यांचे आयुष्य साधारणतः ७ ते ८ वर्षे असते, परंतु ते शेतकरी आणि पशुपालकांसाठी पैसे कमवण्यासाठी पुरेशी लोकर तयार करतात. १५ ते २० मेंढ्यांचे पशुपालन करायचे असेल तर जातीनुसार एका मेंढीची किंमत तीन हजार ते आठ हजार रुपयांपर्यंत असू शकते. २० मेंढ्या खरेदी करण्यासाठी सुमारे १ लाख ते १.५ लाख रुपये खर्च येतो. २० मेंढ्यांसाठी ५०० स्क्वेअर फूट स्टॅबल पुरेसे असेल, जे ३०,००० ते ४०,००० रुपये खर्चून बांधले जाऊ शकते. यामुळे याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल.

# केळीच्या दरात घसरण; प्रति क्विंटलला मिळतोय ८०० रुपये दर!

पुणे : आठ दिवसांपूर्वी केळीला प्रति क्विंटल १६०० रूपयांचा दर मिळत होता; परंतु आजा केळीचा दर अर्ध्यावर म्हणजे आठशेवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. सोयाबीन व कापूस या पिकानंतर केळीनेही सद्यस्थितीत शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घातल्याचे दिसत आहे.

आठ दिवसांपूर्वी केळीला प्रति क्विंटल १,६०० रुपयांपर्यंत दर मिळत होता. केळीच्या बागा अधिक प्रमाणात सुरू होताच केळीचे दर गडगडले आहेत. सध्या सोलापूर, बुऱ्हाणपूर व आंध्र राज्यातील केळी बागा सुरू होताच केळीचे दर गडगडले आहेत, त्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. यापूर्वी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने केळी बागांचे नुकसान झाले, आता



दराचा फटका बसत आहे. एप्रिल महिन्यात वादळी वाऱ्यासह अवकाळीचा मोठा फटका केळी बागांना बसला आहे. त्यामुळे केळी बागांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे, पिकाचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. पूर्वी केळीला चांगले दर मिळत होते आता अवकाळीचा फटका बसला असून दरही गडगडले आहेत. सद्यःस्थितीत केळीला प्रति क्विंटल मिळणारे दर हे खर्चाच्या मानाने परवडणारे नाही, असे तालुक्यातील शेतकयांनी सांगितले. परिणामी शेतकरी वर्ग चिंतेत पडला आहे.

# हरभऱ्याचे उत्पादन वाढणार

हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणारे आणि खाण्यात येणारे डाळवर्गीय पीक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनांपैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७० -७५ टक्के इतका आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनांपैकी ४० -५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरुपात केला जातो.

हरभरा हे रब्बी पीक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेले हरभरा उत्पादनाचे सन २०२२-२३ साठीचे नवीन अंदाज मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच



असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन २७.२ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ३६.३९ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. परंतु मागील वर्ष २०२१-२२ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये हरभरा निर्यात वाढलेली आहे तर आयात कमी झालेली आहे.

मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष फेब्रुवारी २०२३-२४ मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली दिसून येत आहे. फेब्रुवारी २०२४ (१५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत) मध्ये ती ०.५ लाख टन इतकी आहे. जी मागील वर्षी याच कालावधीत २.५ लाख टन इतकी होती. ऑक्टोबर २०२२ पासून हरभऱ्याच्या किंमती वाढत आहेत.

ऑगस्ट २०२३ नंतर त्या सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.

सध्याच्या रब्बी हंगामासाठी हरभऱ्याची सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत रु. ५३३५/क्विंटल एवढी आहे. हरभऱ्याची वाढती निर्यात आणि कमी झालेली आयात ही हरभरा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे.




### जागतिक दिवस:
### भारतीय आगमन दिन : गुयाना, १८३८ पासून.
### आंतरराष्ट्रीय सुईण दिन

### महत्वाच्या घटना

१२६० : कुबलाई खान हा मंगोलियाचा सम्राट बनला.
१८८३ : राष्ट्रीय चळवळीचे संस्थापक तसचं, एक पत्रकार म्हणून कर्तव्य बजावत असतांना तुरुंगात जाणारे सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे पहिले भारतीय पत्रकार ठरले.
१८९३ : न्यूयॉर्क शेरबाजाराचा निर्देशांक कोसळला. देशभर मंदीस सुरुवात.
१९०१ : विष्णू दिगंबर पलुस्करबुवा यांनी लाहोर येथे गंधर्व महाविद्यालयाची स्थापना केली.
१९२० : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर पॅरिसमध्ये रेड क्रॉस अँड रेड क्रेसेंट सोसायटीज (आयएफआरसी) या आंतरराष्ट्रीय महासंघाची स्थापना करण्यात आली.
१९३६ : इटालियन सैन्याने इथिओपियातील आदिसअबाबा शहराचा ताबा घेतला.
१९४४ : महात्मा गांधींची तुरुंगातून सुटका.
१९५५ : पश्चिम जर्मनीला सार्वभौमत्त्व प्राप्त झाले.
१९६४ : युरोप परिषदेने ५ मे हा युरोप दिन घोषित केला.
१९९७ : जयदीप आमरे या साडेपाच वर्षीय बालकाने गोव्यातील मांडवी नदी पोहून पार केली. एवढ्या छोट्या बालकाने ही नदी पोहून पार करण्याची ही पहिलीच घटना आहे.
१९९९ : दक्षिण पाकिस्तानातील हडप्पा येथे केलेल्या उत्खननात पुरातत्त्ववेत्त्यांना सर्वात प्राचीन लिपीचे अवशेष मिळाले.
२००५ : ब्रिटन देशांतील लेबर पार्टीचे नेता टोनी ब्लेयर यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली.
२०१० : इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी(विद्यापीठ) ने (इग्नू) सर्व कोर्समधील लैंगिक कामगार आणि त्यांच्या आश्रीतांचे शुल्क माफ करण्याची घोषणा केली.
२०१७ : सार्क उपग्रह म्हणून ओळखला जाणारा दक्षिण एशिया उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

८६७ : उडा जपानी सम्राट (मृत्यू: १९ जुलै ९३१)
१४७९ : गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू (मृत्यू: १ सप्टेंबर १५७४)
१८१८ : कार्ल मार्क्स जर्मन तत्त्वज्ञ व कम्युनिझमचे प्रणेते (मृत्यू: १४ मार्च १८८३)
१८६४ : निले ब्लाय उर्फ एलिझाबेथ जेन कोचरन शोध्पात्राकारितेच्या जनक यांचा पीट्सबर्ग येथे जन्म.
१९११ : भारतीय शिक्षक व कार्यकर्ते प्रितलाता वडेदार यांचा जन्म. (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३२)
१९१६ : ग्यानी झैलसिंग भारताचे ७ वे राष्ट्रपती, पंजाबचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री (मृत्यू: २५ डिसेंबर १९९४)
१९२९ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रसिद्ध क्रांतिकारक अब्दुल हम्मिद कैसर यांचा जन्मदिन.
१९३५ : राष्ट्रीय पुरस्कार तसचं, हिंदी साहित्य संस्था व गुजरात गौरव पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रकार, लेखक, व्यंगचित्रकार, पत्रकार, पर्यावरणवादी, नाटककार आणि पटकथा लेखक आबिद सुरती यांचा जन्मदिन.
१९३७ : परमवीर चक्र सन्मानित भारतीय सैन्य अधिकरी कर्नल होशियार सिंह यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय जनता पक्षाचे राजकीय नेता व हरियाणा राज्याचे विद्यमान (१० वे) मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांचा जन्मदिन.
१९७० : प्रसिद्ध भारतीय नेमबाज समरेश जंग यांचा जन्मदिन.
१९८९ : लक्ष्मी राय तमिळ अभिनेत्री यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : नेपोलियन बोनापार्ट, फ्रांसचा सम्राट.
१८२१ : फ्रान्सचा सम्राट, असामान्य सेनापती आणि कर्तबगार प्रशासक नेपोलियन बोनापार्ट याचे सेंट हेलेना बेटावर निधन (जन्म: १५ ऑगस्ट १७६९)
१९१८ : त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ 'बालकवी', मराठीतील प्रसिध्द कवी.
१९१८ : त्र्यंबक बापूजी ठोंबरे ऊर्फ 'बालकवी' यांना जळगावजवळील भादली स्टेशनपाशी रेल्वेचे रूळ ओलांडताना आगगाडीखाली सापडून मरण आले. (जन्म: १३ ऑगस्ट १८९०)
१९४३ : रामकृष्णबुवा वझे गायक नट, बलवंत संगीत मंडळी आणि ललित कलादर्श या नाटक कंपन्यांमधे त्यांनी गायनगुरु म्हणून काम केले. केशवराव भोसले, मास्टर दीनानाथ, भालचंद्र पेंढारकर, हरिभाऊ घांग्रेकर हे त्यांचे काही नामांकित विद्यार्थी होत. (जन्म: २८ नोव्हेंबर १८७२)
१९४५ : पं. रामकृष्णबुवा वझे गायनाचार्य यांचा पुणे येथे निधन.
१९८९ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९ (जन्म: ३० ऑगस्ट १९०४ मुंबई)
२००० : वि. मा. कुलकर्णी मुलांच्या समस्यांचे अभ्यासक व समाजशास्त्रज्ञ (जन्म:)
२००६ : नौशाद अली संगीतकार (जन्म: २५ डिसेंबर १९१९)
२००७: लेसर चे निर्माते थिओडोर हेरॉल्ड मॅमन यांचे निधन. (जन्म: ११ जुलै १९२७)
२००८ : बास्किन-रॉबिन्स चे सहसंस्थापक इरब रोबिन्स यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १९१७)
२०१२ : भारतीय क्रिकेटपटू सुरेंद्रनाथ यांचे निधन. (जन्म: ४ जानेवारी १९३७)
२०१७ : भारतातील उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला लीला सेठ यांचे निधन.

# बीड लोकसभा मतदारसंघात मतदानासाठी सूक्ष्म नियोजन

बीड। प्रतिनिधी

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाकडून अनेक प्रयत्न केले जात आहेत. यासाठी सूक्ष्म नियोजनही होत आहे. बीड लोकसभा मतदारसंघात चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. यासह ८५ वर्षापेक्षा अधिक वृद्ध, दिव्यांग, निवडणूक कामासाठी इतर जिल्ह्यात कार्यरत, इतर जिल्ह्यातील चौथा टप्प्यातील मतदार बीड जिल्ह्यात कार्यरत, १३ मे रोजी विविध विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राच्या ठिकाणी कर्तव्य पालन करत असणारे मतदार, निवडणुकीच्या काळात विविध कामांवर कार्यरत मतदारांनी मतदान करावे यासाठी आयोगाने वेगवेगळ्या उपाययोजना योजिल्या आहेत.

मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी वेगवेगळे उपाययोजना केले जात आहेत. त्यातच गृह मतदान हा एक विशेष उपक्रम निवडणूक आयोगाद्वारे राबविला जात आहे. बीड लोकसभा मतदारसंघात ३९ हजार २०५ इतके मतदार ८५ वर्षाच्या अधिकच्या वयोगटातील आहेत. यापैकी ३४० आणि एकूण दिव्यांग ८५६२ पैकी ५३ दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी अर्ज दाखल केला होता. असे एकूण ३९३ मतदार गृह मतदानाचा लाभ घेणार होते. आता ३९१ वृद्ध



## निवडणूक निरीक्षक यांनी स्ट्राँग रूमला दिल्या भेटी

बीड निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी बीड लोकसभा मतदार संघाच्या अनुषंगाने आष्टी, गेवराई, बीड, माजलगाव या विधानसभा मतदारसंघातील स्ट्राँग रूमला भेट देऊन पाहणी केली. सोमवार दिनांक १३ मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान होणार असून त्या अनुषंगाने श्री हक यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे झालेल्या तयारीची पाहणी केली.

आणि दिव्यांग गृह मतदानाचा लाभ घेणार आहेत. मतदानाच्या कामी कार्यरत असणारे बीडचे निवासी जे इतर ठिकाणी कार्यरत आहेत, तिथे मतदान ते करू शकतात. यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात इतर दहा जिल्ह्यात बीड मधील निवडणुकीच्या कामावर असणाऱ्या मतदारांना मतपत्रिका त्यांच्या विधानसभा निहाय ठिकाणी पाठविण्यात आलेल्या आहेत. त्या जिल्ह्यातील सुविधा केंद्रात ते निश्चित दिवशी मतदान करून पुन्हा उलट टपाली त्या मतपत्रिका बीड जिल्ह्यात येतील. असे एकूण १०३४ मतदार मतदान करणार आहेत.

बीड लोकसभा मतदारसंघात इतर जिल्ह्यातील कार्यरत कर्मचारी ज्यांचे मतदान चौथा टप्प्यातच आहे त्यांच्या मतपत्रिका त्या त्या जिल्ह्यातून येणार असून येथे सुविधा केंद्रात ते मतदान करतील असे एकूण ३६५ मतदार बीड जिल्ह्यात निवडणुकीच्या कामावर आहेत. मतदान झाल्यावर त्या मतपत्रिका संबंधित जिल्ह्यात पाठवण्यात येणार आहेत. बीड जिल्ह्यातीलच रहिवासी जे मतदान पथकाच्या विविध कामात गुंतलेले आहेत. जसे पोलीस, होमगार्ड , व्हिडिओ ग्राफर , वाहन चालक असे एकूण १८०० मतदार त्यांच्या मतदानाचा हक्क यावेळी बीड लोकसभा मतदारसंघातील दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणाच्या ठिकाणी सुविधा केंद्र उभारले असून येथे ते मतदानाचा हक्क बजावू शकतील. असे प्रशिक्षण ४, ५ मे तथा ११ मे ला होणार आहे. १०, ११ व १२ मे रोजी जिल्हास्तरीय पोस्टल बॅलेट द्वारा ६०० मतदार मतदान करणार आहेत. यासह मतदान केंद्रावर १३ मे रोजी कार्यरत असणारे केंद्राध्यक्ष, मतदार अधिकारी व अन्य कर्मचारी जे निवडणुकीच्या कामावर १३ मे रोजी आहेत. ते ज्या मतदान केंद्रावर कार्यरत असणार आहेत तिथेच करतील. असे एकूण ८२१५ कर्मचारी हे त्यांच्या मतांचा हक्क १३ मे रोजी बजावतील.

## मतदानामुळेच लोकशाही होणार सशक्त : जिल्हा निवडणूक अधिकारी

बीड । प्रतिनिधी

मतदानामुळेच लोकशाही सशक्त होणार. बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांनी मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले.बीड जिल्ह्याचे मतदान चौथ्या टप्प्यात सोमवार दिनांक १३ मे रोजी होणार असून जिल्ह्यात २१ लाखापेक्षा अधिक मतदार आहेत या सर्व मतदारांना आवाहन करून सांगितले, की मतदानाचा हक्क १३ मे रोजी बजावावा.


निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडण्याचा लोकशाहीचा महोत्सव दर पाच वर्षांनी एकदाच येतो. यामध्ये आपले कर्तव्य प्रत्येक सुजाण मतदाराने निभावले पाहिजे.लक्षात असू द्या सोमवार दिनांक १३ मे चौथ्या टप्प्यात १३ मे ला निवडणुका होणार असून केवळ निवडणुकीचा हक्क बजावण्यासाठी शासनाने सुट्टी जाहीर केली आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाची संपूर्ण यंत्रणा बीडवासियांसाठी कार्यरत असून ही संपूर्ण यंत्रणा विशेष परिश्रम घेत आहे.

बीडच्या मतदारांची यात मुख्य भूमिका आहे. सहली/ तीर्थाटन करताना सोमवार दिनांक १३ मे तारीख लक्षात असू द्या. आपल्या तर्जनीला शाई लावण्याची ही संधी गमावू नका. तरी मतदानाचा दिवस हा महत्त्वाचा असून मतदान १३ मे ला करून लोकशाहीच्या महोत्सवात सहभागी होऊन मतदान करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

## भारतराव शिंदे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील रहिवाशी तथा मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक डॉ.प्रमोद शिंदे यांचे वडिल भारतराव साहेबराव शिंदे यांचे आज ७३ व्या वर्षी दुःखद निधन झाले.



त्यांच्यावर बीड शहरातील भगवानबाबा प्रतिष्ठान परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, जावई नातवंडे असा परिवार आहे. बीड शहरातील हाडाचे तज्ज्ञ डॉक्टर प्रमोद शिंदे यांचे ते वडील होत.

## ग्रामीण भागात अवैध दारू विक्रेत्यांवर लगाम घालण्याचे पोलिसांसमोर आवाहन

### जागोजागी मिळते ग्रामीण भागात अवैध दारू पोलिसाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होतेय का ?

### लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तरी अवैध दारू विक्रीवर अंकुश आणा

### ग्रामीण भागात दारूच्या व्यसनाने कुटुंब उद्ध्वस्त होत आहेत

धारूर। प्रतिनिधी

तालुक्यात ग्रामीण भागामध्ये सर्रास देशी दारू मिळत असल्याने तळीरामांची संख्या वाढली आहे. मिळणारी दारू भेसळ -बनावट युक्त आहे का चांगली आहे हे पण कुणी पाहत नाही व्यसनाच्या आहरी जाऊन ती घेतात सध्या लोकसभा निवडणुका असल्याने पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. पण याकडे पूर्णतः पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. या सर्व प्रकाराकडे पोलिस व उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष असल्याने माफियांचे धाडस वाढत आहे.

धारूर तालुक्यामध्ये ग्रामीण भागात सर्वत्र देशी दारू मिळत असल्याने तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे ओढली जात आहेत. कारखान्याला गेलेला मजूर गाडी वापरल्याने दारू विक्री सुरू झाली आहे. उद्या निवडणुकीचे वारे असल्याने दारूच्या नशेमध्ये यातून अनेकदा वाद निर्माण होत आहेत. यातून गटागटामध्ये भांडण होऊ शकते याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज असतानाही पोलीस प्रशासन लक्ष द्यायला तयार नाही. गावानजीकच्या ढाब्यावर, गावातील टपरीवर दारु सहज उपलब्ध असल्याने तळीरामांची संख्या वाढली ही बाब पोलिस यंत्रणेला माहित असतांनाही त्यांच्याकडून यावर ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत. या दारूमुळे कौटुंबिक वाद वाढत आहेत. जनसामान्य नागरिक या तळी रामाच्या दादागिरीला शरण गेले आहेत. वरिष्ठांकडून आदेश येताच काही भागात कारवाई करत चार-दोन बॉक्स पकडले जातात. पुन्हा पहिले पाढे पंचावन्न होतात. यावर आता पोलिस व उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तत्या मोहिम उघडत कारवाई करावी व ग्रामीण भागातील अवैध दारु विक्री बंद करावी अशी मागणी ग्रामीण भागातील नागरीक करत आहेत.

## संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी केले मस्के परिवाराचे सांत्वन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिनेश मस्के यांचे संभाजी नगर येथे अल्पशा आजाराने निधन झाले होते.त्यांच्या जाण्याने बाहेरगावांसह वडवणी तालुक्यावर शोककळा पसरली होती.मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी बाहेगव्हाण येथे गुरुवार दि २ रोजी जाऊन मस्के परिवाराच्या दुःखात सामील होत त्यांचे सांत्वन केले.



याबाबत आधिक माहिती अशी कि,दिनेश मस्के हे राजकारणासह समाजकारणामध्ये ते किंग मेकर म्हणून प्रसिद्ध होते.ते साधारणतः तीन चार महिन्यापुर्वी वडवणी येथील त्यांच्या अभय होंडा शोरुम मध्ये पाय घसरुन पडले होते. यामध्ये पायाला गंभीर स्वरुपात दुखापत झाली होती. पुणे येथील खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली होती. परंतु सदरील शस्त्रक्रिया झाल्या नंतर शाररिक प्रकृती साथ देत नसल्याने परस्थिती खालवली होती. यात उपचारासाठी संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले होते.

प्रकृती उपचाराला साथ देत नव्हती यामध्ये सोमवार दि २९ रोजी मध्यरात्री साडे बारा वाजण्याच्या सुमारास त्यांनी जगाचा अखेरचा निरोप घेतला.त्यांच्या जाण्याने संपूर्ण वडवणी तालुक्यात शोळ कळा पसरली होती.मस्के परिवार वर त्यांच्या मित्र परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता त्यांचे सांत्वन करण्यासाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी मस्के कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

## हज यात्रेकरूंसाठी मेंदुज्वर तापाचे लसीकरण शिबिर

बीड । प्रतिनिधी

खादमीन हजाज कमिटी बीडतर्फे यावर्षीही या वर्षी पवित्र हजला जाणाऱ्या हज यात्रेकरूंसाठी मेंदूज्वर तापाचे लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिर रविवार, १२ मे २०२४ रोजी जिल्हा शासकीय रुग्णालयात सकाळी ९:३० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू राहणार आहे.

ही लस (डोस) सर्व हज यात्रेकरूंसाठी अनिवार्य आहे. हज यात्रेकरूंनी १२ मे रोजी डोस घेण्यासाठी येताना त्यांचे आय-कार्ड (ओळखपत्र) सोबत आणावे. आय कार्ड उपलब्ध नसल्यास कव्हर हेड सोबत आणावे . हे शिबिर जिल्हा सिव्हिल हॉस्पिटलचे सिव्हिल सर्जन डॉ. अशोक बडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. सर्व हज यात्रेकरूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा आणि त्याचप्रमाणे या वर्षातील चौथे आणि शेवटचे प्रशिक्षण सत्र (हज तरबियती नशिष्त ) २३ मे २०२४ रोजी अमन लान्स बीड येथे सकाळी १० ते ६ वाजे पर्यंत आयोजित केले आहे.

हज यात्रेकरूंनी नमूद केलेल्या दोन्ही ठिकाणी वेळेवर उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन खादमीन हजाज कमिटी बीडचे अध्यक्ष मुहम्मद जमील उर्फ जे के मोबाईल क्रमांक ९९७०५३२१६८ व सचिव महंमद फारुक इरफान ९४२२३३१९७२ यांनी केले आहे . तसेच ताल्युातील ईतर ठिकाणी सदर शिबीर तालुका स्तरावर होईल. अधिक माहितीसाठी वरील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येईल.

## ट्रॅक्टर कंपनीतील कर्मचारी झाला अभिनेता-निर्माता

बीड । प्रतिनिधी

चित्रपटात अभिनय करावा, चित्रपट निर्माण करावा अशी सुप्त इच्छा व स्वप्न मनात बाळगणारे अविनाश कवठणकर यांनी मनातली ही इच्छा पुर्ण केलीच. त्यांनी निर्माण व अभिनय केलेला पहिला हिंदी चित्रपट लोरी येत्या ३ मे रोजी संपूर्ण भारतात प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाला बीड जिल्ह्याचे जावई अल्ताफ दादासाहेब शेख यांनी संगीत दिले असून गाणीही त्यांनीच लिहिली आहेत.

लोरी या हिंदी चित्रपटाचे निर्माते व अभिनेते अविनाश कवठणकर मुंबईमध्ये महिंद्रा ट्रॅक्टर या कंपनीत साधारण कर्मचारी म्हणून १९९१ सालापासून काम करतात. अविनाश हे लहानपणापासूनच स्वप्न पाहायचे. रूपेरी पडद्यावर हिरो व्हावे. चित्रपट निर्मिती करावी. पण घरची परिस्थिती हलाखीची होती. आई सतत आजारी असायची. आईच्या तब्येतीची जास्त काळजी घ्यावी लागायची. यामुळे त्यांनी लग्न सुद्धा केले नाही. आईची सेवा करत शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रपंच चालविण्यासाठी महिंद्रा ट्रॅक्टर कंपनीत नोकरी पत्करली. पण चित्रपट निर्माण करण्याचे व अभिनय करण्याचे स्वप्न उराशी बाळगून होतेच.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगाचे प्रेरणास्त्रोत-पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्माने हजारो वर्षांची गुलामगिरी नाहीशी झाली.त्यांनी भेदभावाच्या गोष्टी समूळ नष्ट करुन, मानवाला त्यांचे हक्क आणि अधिकार मिळवून दिले. चार वर्णात असलेली समाज व्यवस्था संविधानातून मुक्त केली. म्हणून आजचे चित्र पूर्णतः वेगळे आहे.त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ भारताचे नव्हे तर जगाचे प्रेरणास्रोत आहेत.असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त खांडवी, कामखेडा, जरुड, धानोरा,रौळसागाव, पालवन चौक येथे जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी पप्पू कागदे बोलत होते. उपस्थितांना संबोधित करताना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३२ पदव्या संपादित



केल्या. त्यांना ११ भाषा बोलता येत होत्या. समाजाला गुलामीतून बाहेर काढण्यासाठी पाच वृत्तपत्रे सुरु केली. काळाराम मंदिर प्रवेश, सामाजिक बदलासाठी चवदारतळे सत्याग्रह, मनुस्मृति दहन यासारखी मानवाधिकारांची आंदोलने उभा केली. अंधश्रध्देत आणि कर्मकांडात अडकलेल्या समूहाला बौद्ध धम्माचा मार्ग दिला. भारताचे संविधान लिहून सर्व मानवजातीचा उद्धार केला. त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत, आणि ते कधीही फेडता येणार नाहीत. एवढे महान कार्य बाबासाहेबानी त्यांच्या आयुष्यात केले. असे प्रतिपादन पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.

यावेळी राजू जोगदंड, किशोर कांडेकर, किसन तांगडे, बबन वडमारे, पुष्पाताई तुरुकमारे, ॲड.अनिता चक्रे, अविनाश जोगदंड, शाम वीर, शेख बिलालभाई, राजू पटेल, नामदेव वाघमारे, विजय ओव्हाळ, नाना मस्के, बाबासाहेब ओव्हाळ, बापू उजगरे, उमाजी वाघमारे, गाढे सर, किशोर भोले, शुभम भोले, अण्णा भोले, विनोद शेजवळ, अजित सावंत, भैय्या कोरडे, योगेश कोरडे, किरण खेमाडे, रमेश खेमाडे, पप्पू खेमाडे आदींची उपस्थिती होती.

## कागदी चिठ्यांच्या पलकिडे जाऊन टपाल विभागाची हायटेक मोबाइल मनिऑर्डर योजनेस नागरिकांची पसंती

ज्योतीराम पांढरपोटे

माजलगाव :कागदी चिठ्ठयांच्या पलकिडे जाऊन हायटेक होऊ लागलेल्या टपाल विभागाची मोबाइल मनिऑर्डर योजना ग्राहकांच्या पसंतीस उतरू लागली आहे. अवघ्या काही मिनिटांत सुरक्षितरित्या पैसे भारतभर कोठेही पाठविण्याची हमी टपाल विभाग घेत असल्याने या योजनेला प्रतिसाद वाढतो आहे. त्यामुळे तारे प्रमाणेच मनी ऑर्डर कालबाह्य ठरण्याची शक्यताही वर्तविली जात आहे.

आपल्या कुटुंबाला अथवा आप्तजनांना पैसे पाठविण्यासाठी पोस्टाची मनी ऑर्डरची सेवा सर्वात पसंत केली गेली.मनी ऑर्डर येते त्या तारखेकडे विशेषत: ग्रामीण भागातील लोक डोळे लावून बसत असत.टपाल विभागाची ही सेवा निरंतर सुरू असली तरी बदलत्या काळानुसार याच सेवेला टपाल विभागाने अन्य पर्याय देखील उपलब्ध करून दिले आहेत.मनी ऑर्डर पोहोचण्यास होणारा विलंब आणि आधुनिक युगाची कास धरत पुढचे पाऊल म्हणून इलेक्ट्रॉनिक मनी ऑर्डर (इएमओ) सेवा सुरू करण्यात आली.मनी ऑर्डर असो किंवा इएमओ १०० रुपयांसाठी पाच रुपये या प्रमाणे १ हजार रुपयांच्या मनी ऑर्डरसाठी ग्राहकाला ५० रुपये शुल्क मोजावे लागते. त्याही पेक्षा स्वस्त आणि काही मिनिटांतच पैसे ट्रान्सफर करू शकणारी मोबाइल मनी ट्रान्सफर योजना टपाल विभागाच्या वतीने सुरू करण्यात आली असून ग्राहकांचा तिला चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती टपाल कार्यालयातील सुत्रांनी दिली आहे.

### काळाच्या ओघात मनी ऑर्डर होणार कालबाह्य




### रक्कम व रक्कमेवर आकारले जाणारे शुल्क असे

**१-/ते १५००-/ रूपया पर्यंतच्या रक्कमेवर ४५-/ रुपये शुल्क आकारले जाते**
**१५०१-/ ते ५०००-/ रूपया पर्यंतच्या रक्कमेवर ७९-/ रुपये शुल्क आकारले जाते**
**५००१-/ ते १००००-/ हजार रूपया पर्यंतच्या रक्कमेवर ११२-/ रुपये शुल्क आकारले जाते**

### असे होतात पैसे ट्रान्सफर

पैसे पाठविणाऱ्या व्यक्तीला टपाल कार्यालयात एक अर्ज भरून द्यावा लागतो.रक्कम आणि त्यासाठीचे शुल्क जमा करावे लागते.किमान १ हजार ते १० हजारांपर्यंतची रक्कम पाठविता येते.टपाल कार्यालय विशिष्ट मोबाईलवरून एसएमएस ऑपरेट करते.त्यामध्ये पैसे पाठविणाऱ्या व्यक्तीसह ते स्वीकारणाऱ्या व्यक्तीचे नाव, रक्कम आणि जवळच्या सोयीस्कर टपाल कार्यालयाचा पत्ता असतो.त्या दोन्ही व्यक्तींना विशिष्ट सिक्रेट क्रमांक दिला जातो. पैसे स्वीकारताना तो एसएमएस दाखविणे आवश्यक असते.किमान सात दिवसांत पैसे स्वीकारता येतात. अन्यथा ते पुन्हा पैसे पाठविणाऱ्याला परत दिले जातात. दूर गावी जाताना मोठी रक्कम बाळगण्या ऐवजी या सेवेची मदत घेणे फायद्याचे ठरले असा दावा टपाल विभागाकडून केला जातो आहे.

## परडी माटेगाव येथे वादळी वाऱ्याने सोलार पॅनलचे प्रचंड नुकसान



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात गेली एक महीना झालं वादळी वार्यासह गारांच्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.यामध्ये उन्हाळी पिक, फळबागा सह सोलार पॅनलचे मोठे नुकसान झाले आहे.तरी शेतकर्यांच्या नुकसान झालेल्या पिकांसह सोलार पॅनलच्या पाट्या तात्काळ देण्याची मागणी होत आहे.

एक महिना झाला पडत असलेल्या वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाने अक्षरशा धैमान घालून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणनु नुकसान झाल्याने शेतकऱ्यावर दुष्काळात तेरावा महिन्याची वेळ आली आहे.

शेतकऱ्यांना शेती पिकाला दिवसा लाईट मिळण्यासाठी शासनाने सोलार पंप शेतकऱ्यांना वितरित केले आहे.

वादळी वाऱ्यासह परडी माटेगाव येथील शेतकरी शंकरराव अण्णासाहेब शेंडगे यांच्या शेतातील गट नंबर ३१ मधील दि १२ एप्रील रोजी झालेल्या वादळी वार्याने सोलार पंपचे पॅनल संपूर्णता उखडून पडले आहेत.यामध्ये नऊ सोलर पॅनलच्या पाट्या उखडून पडल्याने लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. याचे पंचनामे करून प्रशासनाने व कंपनीने शेतकऱ्यांना तात्काळ सोलार प्लेटा देऊन सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी विनंती शेतकर्यांमधून केली जात आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
महासंग्राम
रविवार, दि. ५ मे २०२४


# गेल्या १० वर्षात ८४ हजार शेतकरी, शेतमजूरांच्या आत्महत्या -बाळासाहेब आंबेडकर

## मोदी आणि महाविकास आघाडीवर घणाघात : गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे ही काळाची गरज

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

गेल्या १० वर्षात देशातील ८४ हजार शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्या याची बातमी कुठेही आली नाही. यापैकी आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांना मोदीने किती मदत दिली याची माहिती द्यावी असे अँड. बाळासाहेब आंबेडकर यांनी घणाघात केला. ते वंचित बहुजन आघाडी बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाईत आयोजित परिवर्तन सभेत बोलत होते. यावेळी नागरिकांची मोठी उपस्थिती होती. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, उमेदवार अशोक हिंगे यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना म्हणाले की, पंतप्रधान यांचं कार्यालय हे मानवतेच कार्यलाय असताना हे वसुलीचे कार्यलाय झालं, राजकारणात नीतिमत्ता ची फार मोठी किंमत आहे. मात्र सध्याची परिस्थिती पाहता राजकारणात कुठेही नीतिमत्ता दिसत नाही असं म्हणत महायुतीवर निशाण साधला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराची बांधिलकी नाही, ज्याला नीतिमत्ता नाही तो त्याच्या फायद्यासाठी काम करणार असं म्हणत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यावर हल्लाबोल केला.



उमेदवार अशोक हिंगे पाटील जातीपातीचे नाहीतर विकासाचे राजकारण करणार, महाविकास आघाडी व महायुती हे दोघे एकच आहेत, त्यांना धडा शिकवण्यासाठी मला अँड.प्रकाश आंबेडकर यांनी बीड लोकसभेची उमेदवारी दिली आहे. मराठा आरक्षण तसेच मुस्लिम, धनगर,आरक्षण प्रश्नावर आपण अगोदरही भूमिका घेतली आहे.आत्ता ही घेली आहे. आणि यापुढेही भूमिका घेऊन मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहे. यामुळे मला लोकसभेत पाठवा, प्रस्थापित राजकीय धडा शिकवा आसे सांगीतले.

मोदी असं म्हणतात माझ्या कालावधीत काहीच करप्शन झालं नाही काँग्रेसवल्यानी लिस्ट काढली त्या लिस्ट मध्ये किती ठिकाणी कारप्शन झालं याची लिस्ट काँग्रेसवाल्यानी दिली ती अँड.बाळासाहेब आंबेडकर यांनी जनतेसमोर वाचून दाखवली. महागाई बरोबर बेरोजगारी वाढली, मोदींमुळे सगळं देशोधडीला लागले, हे चोरांचे, व्यापाराचे, लुटारांचे सरकार आहे.

इथले शासन राज्य करण्यासाठी नाही तर तोडमोड करण्यासाठी आहे .मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण साठी राजकीय भूमिका घेणं अवघड झालं. इथल्या गरीब मराठ्यांना आरक्षण दिलं पाहिजे ही काळाची गरज आहे. शरद पवारांना देखील मी भूमिका घेण्यासाठी सांगितले होते असं ऍड.आंबेडकर म्हणाले अंबाजोगाई येथील सभेला उपस्थित मान्यवर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड प्रकाश आंबेडकर,बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील, जिल्हाध्यक्ष अध्यक्ष शैलेश कांबळे, मिलिंद घाडगे,पंजाबराव डक, विष्णु जाधव, डॉ.धर्मराज चव्हाण,महेश निनाळे,तय्यब खान,बिबीशन चाटे, खाजामिया पठान, बाबुराव मस्के,विष्णु देवकाते वैभव स्वामी,डॉ.नितिन सोनवणे, प्रा. छाया हिरवे,अँड अनिता चक्रे, पुष्पाताई तुरूकमारे,यूनुस शेख,पुरुषोत्तम वीर,सुरेश पोतदार,धम्मनंद साळवे,सचिन उजगरे,अंकुश जाधव, रानबा उजगरे, बालाजी जगतकर,अजय सरवदे, बालासाहेब जगतकर,गौतम आगळे, प्रसन्नजित रोडे,चंद्रकांत खरात, रोहन मगर, पुर्वचे जिल्हा तालुका व शह ,समता सैनिक, भारतीय बौद्ध महासभा,सम्यक विद्यार्थी आंदोलनचे पदाधिकारी उपस्थित होते.




### परळीवाल्यांना पाडा–सरवदे

बीड जिल्ह्याचे नुकसान आणि बीड जिल्ह्याला भकास करायचं काम परळीहून झालेला आहे त्यामुळे या परळीवाल्यांना पाडा आणि वंचित बहुजन आघाडीचे अशोक हिंगे पाटलांना निवडून आणा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते अजय सरवदे आंबेजोगाईच्या सभेमध्ये केले आहे.

# बजरंग सोनवनेंना मराठा समाजाला मते मागण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही-गोकुळ सवासे

**शिरुर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे ऊमेद्वार बजरंग सोनवने यांनी मराठा समाजाला मते मागण्याचा नैतिक अधिकार गमावला आसुन त्यांना मते माघण्याचा कोणताही अधिकार नसल्याचा आरोप अपक्ष ऊमेद्वार गोकुळ सवासे यांनी केला आहे.



गेल्या लोकसभेला बजरंग सोनवने यांचा जवळपास दिड लाखाच्या पुढे पराभव झाला होता.आताही बजरंग सोनवने हे ऐनवेळेस धनजंय मुंडे यांना सोडत शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये ऊमेद्वारीसठी दाखल झालेले आहेत.त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासह अनेक प्रश्न सतत बगल दिलेली आहे.गेल्या लोकसभा निवडनुकीला आलेले ते आजच्या निवडनुकीच्या वेळेस आलेत यावरुनच त्यांचे समाजाप्रती आसलेले प्रेम दिसुन येत आहे.आज त्यांना समाजाला मी मनेज नसल्याचा पुरावा प्रत्येक ठिकाणी द्यावा लागत आहे एवढी कठीन वेळ त्यांच्यावर आलेली आहे.मराठा आरक्षण आंदोलनात एकदाही सामील न होता आज मतदानासाठी मराठा समाजाला आश्वासन देण्याचे काम सोनवने हे करीत आसुन मात्र जनता हि दुतखुळी राहीली नसुन अश्या दलबदलु नेत्याला घरी बसवल्या शिवाय राहणार नसल्याचे अपक्ष ऊमेद्वार गोकुळ सवासे यांनी म्हटले आहे. दिवसे-दिवस बीड लोकसभेमध्ये वातावरण तापलेले पाहायला मिळत आहे.युतीकडुन पंकजा मुंडे तर महाविकास आघाडीकडुन बंजरग सोनवने व वंचितकडुन अशोक हिंगे व यांच्यासह अनेक ऊमेद्वार ऊभे ठाकले आहेत.यातच गेल्या कित्येक वर्षापासुन सामाजिक आंदोलनासह मराठा आरक्षणात सक्रिय सहभाग घेणारे गोकुळ सवासे यांनी ऊमेद्वारी अर्ज दाखल केल्याने बजरंग सोनवने यांना निश्चितच फटका बसणार आहे.

# आष्टी येथे होणाऱ्या शरदचंद्रजी पवार यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे – राम खाडे

**आष्टी । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ सोमवार दिनांक ६ मे रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे मा शरदचंद्रजी पवार साहेब यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्रजी पवार गट) आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी केले आहे.




बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी संपूर्ण जिल्हा पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित झाला आहे. खासदार प्रीतम मुंडे यांच्या दहा वर्षाच्या काळात आष्टी मतदार संघात ग्रामीण भागात जनसंपर्क नसल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे. अहमदनगर बीड परळी रेल्वेचे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे रेल्वेचे स्वप्न आज ही अधुरेच राहिले असून सदरील रेल्वे ही अहमदनगर ते अमळनेर पर्यंत कधी येते तर कधी येत नाही. सदरील रेल्वे

◀◀ पान ३ वर

# पंकजाताई मुंडे यांना साथ देत अहिल्यादेवी होळकर यांचा आशिर्वाद देऊ -माधव निर्मळ

दिंद्रुड प्रतिनिधी

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांनी धनगर समाजातील राम शिंदे व महादेव जानकर या युवकांना आमदार करत धनगर समाजाला न्याय दिला, धनगर समाजाच्या हितासाठी जीवनात लोकनेते मुंडे यांचे काम मोठे होते याचीच परतफेड करण्यासाठी लोकनेते स्व.गोपीनाथ जी मुंडे यांच्या कन्या पंकजाताई मुंडे यांना लोकसभा निवडणुकीत धनगर समाजाने एकत्र येत अहिल्याबाई होळकरांचा शुभाशीर्वाद देत प्रचंड बहुमताने निवडून आणण्याचे आवाहन धारूर येथील युवा नेते माधव निर्मळ यांनी केले. धारूर व माजलगाव तालुक्यातील विविध गावात भेटी देत निर्मळ यांनी



घोंगडी बैठकीस धनगर समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद

धनगर समाजाला एकत्र आणत श्रीमती मुंडे यांना विजयी करण्याचे आवाहन करत धनगर समाजाची वज्रमूठ आवळली आहे. धनगर समाजाचा घोंगडी बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत आहे.

धारूर तालुक्यातील जवळा, माजलगाव तालुक्यातील शिंदेवाडी,हानुमान नगर शिंदेवाडी येथे महायुतीच्या उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या प्रचारार्थ शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या घोंगडी बैठकीत पंकजा मुंडे यांना विजयी करण्याबाबत एक मुखाने निर्णय घेण्यात आला.यावेळी मार्गदर्शन करताना धनगर समाजाचे नेते माधव निर्मळ यांनी

◀◀ पान ३ वर

# पंकजाताईंच्या विजयासाठी अमरसिंह पंडितांनी जबरदस्त फिल्डिंग लावली

**बीड । प्रतिनिधी**

अजित दादा राष्ट्रवादी पक्षाचे नेते तथा महायुतीचे जिल्हा समन्वयक अमरसिंह पंडीतांनी गेवराई विधानसभा मतदार संघातून उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मताधिक्य मिळवून देण्याचा संकल्प हाती घेतला असून, गेवराई स्थित कृष्णाई निवासस्थानी जिल्हा परिषद गट निहाय प्रमुखांच्या बैठका, उसतोड मुकादमाच्या बैठका घेण्याचा सपाटा चालू ठेवला. कार्यकर्त्यांच्या मनातल्या भावना जाणून घेताना केंद्रात कोणाचे सरकार येणार ? हा प्रश्न विचारल्या नंतर भाजपाचे सरकार येणार असे उत्तर मिळाल्या नंतर अमरसिंह पंडितांनी मग उद्याच्या लोकसभा निवडणुकीत आपल्या मतलबासाठी पंकजाताईला



♦ शंका मनात ठेऊ नका, विरोधही करू नका, आपल्या हितासाठी पंकजाताईला मतदान करा..!

♦ एका वर्षात नदीवरचे बॅरेजेस पूर्ण करून हरित क्रांति घडवणार –अमरसिंह पंडित

मतदान करायला हवे. कारण मला सिंदफना नदीवरील आठ बॅरेजेस गोदावरी नदीत एक आणि नामालगाव जवळ एक पूर्ण करायचे असून, तसा शब्द पंकजाताईनी आपल्याला दिला आहे. केंद्र आणि राज्य सरकार सोबत राहून विकास करणे हाच आपला मतलब त्यामुळे भावनेच्या भरात राजकीय गडबड करू नका आपण मताधिक्य देण्याचा शब्द दिला असे सांगत हात जोडून विनंती करत मतदान करण्याचे त्यांनी आवाहन केले.

कृष्णाई बंगल्यावर तालुक्यातील उसतोड मुकादमच्या बैठका जिल्हा परिषद सर्कल निहाय बोलवल्या होत्या ज्यात मादळमोही, चकलंबा, उमापूर, धोंडराई, रेवकि, तलवडा, जातेगांव, गढी, पाचेगांव परिसरातून प्रमुख कार्यकर्ते ही उपस्थित होते. अमरसिंह पंडितांनी बैठकीत लोकांच्या मनातल्या शंकेचे निरसन केले. लोकसभा निवडणुकीत आपण पंकजाताई मुंडेना मतदान करण्याचा निर्णय विकासाच्या मुद्यावर घेतला. केंद्रात आणि राज्यात भाजपाचे सरकार उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि आपले पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली

◀◀ पान ३ वर

# विकासात्मक नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांना सर्वाधीक मताने विजयी करा–आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या महायुती शासनाने मराठा समाजासाठी जाहीर केलेल्या विविध सवलती आणि मराठा समाजाला १० टक्के दिलेले आरक्षण हे टिकणारेच आहे.याबाबत भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी महायुतीचे सरकार वचनबद्ध असून मराठा समाजाने समाज माध्यमांवरील अफवा आणि तर्कवितर्क यांचा विचार न करता महायुतीच्या बीड लोकसभा निवडणुकीतील उमेदवार कर्तृत्ववान,

विकासात्मक नेतृत्व असलेल्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले.




बीड लोकसभा निवडणुकीतील भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षांच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आयोजित पाटोदा तालुक्यातील अंमळनेर जिल्हा परिषद गटामधील मुगगाव,अंतापूर, निवडुंगा, वाहली, लांबरवाडी, सुप्पा, कुसळंब, धोपटवाडी, जरेवाडी, सरदवाडी, पिंपळवंडी, आंबेवाडी,चंद्रेवाडी, अंमळनेर, कोतन, गंगावाडी, पांढरवाडी, सकुंडवाडी या गावांमध्ये कॉर्नर बैठकांमध्ये ते बोलत होते. ते आ.धस पुढे म्हणाले, सध्याच्या महायुतीच्या राज्य शासनाने मराठा समाजाला अनेक सवलती जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये उच्च शिक्षणासाठी शाहू महाराज शिष्यवृत्ती, पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना, सारथी योजना या योजनांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होत असून मोठ्या प्रमाणावर मराठा कुणबी जात प्रमाणपत्र वाटप केली आहेत. तसेच मराठा समाजाला सामाजिक,शैक्षणिक, मागासप्रवर्ग म्हणून १० टक्के दिलेले आरक्षण हे न्यायालयामध्ये टिकेल अशाच पद्धतीने कोणताही भेदभाव न करता त्रुटींची पूर्तता करून सादर केलेले आहे. त्यामुळे दिलेले आरक्षण टिकणारच आहे. परंतु याबाबत ग्रामीण भागामध्ये समाज माध्यमांमध्ये अफवा पसरवून समाजासमाजामध्ये गैरसमज पसरवले जात आहेत. याबाबत मराठा समाजातील सुजाण आणि जागरूक नागरिकांनी सकारात्मक विचार करून भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव देशपातळीवर सर्वांशी परिचित असलेल्या माजी ग्रामविकास मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी राज्याचे

◀◀ पान ३ वर

# बजरंग सोनवणे यांच्या विजयाचा निर्धार

## दत्ता कांबळे यांनी ग्रामीण भाग पिंजून काढला

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकसभा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग सोनावणे यांच्या प्रचारार्थ भारतीय काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रचाराची वज्रमुठ अवळली असल्याचे दिसून येत आहे. तालुक्यातील टाकरवण, वाघोरा, काळेगावथडी, हिवरा, लुखेगाव येथे भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ सर्वसामान्य जनतेच्या घरा घरात तुतारी धारी माणूस हे चिन्ह पोहचून बजरंग सोनवणे यांच्या विजयाचा संकल्प केला असून, ग्रामीण भाग पिंजून




काढला आहे मतदारांनी विजयाचा निर्धार केला असून, लोकसभा निवडणूक ही नुसती निवडणूक नसून,संविधान रक्षणाची चळवळ आहे असे समजून,तळागाळातील सर्वसामान्य जनतेने लोकशाही वाचवण्यासाठी मतदान रुपी इंडिया आघाडीला समर्थन द्या असे भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.यावेळी सोबत कम्युनिष्ट पक्षाचे फारूक अण्णा,राहुल घोडे, संकेत कासार,इंद्रजित अडागळे,मंगेश शिंदे, अशोक कसबे, सय्यद शाखेर, नाथाभाऊ घडसे, दत्ता कसबे, शिवाजी हिवाळे, अनिकेत तोडके सह काँग्रेसचे कर्यकर्ते उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्याची मागणी संसदेत लावून धरू – बजरंग सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभेचा खासदार म्हणून निवडून गेल्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी संसदेत लावून धरू. त्यासाठी खासदारकी पणाला लावण्याची वेळ आली. तरी मागे हटणार नाही. असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी बीड येथे डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यकर्ता बैठकीत दिले.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक बीड येथील नीलकमल हॉटेल



येथे आयोजित केली होती. या बैठकीत बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकस आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे बोलत होते. बैठकीस राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर, प्रदेश प्रवक्त्या सुशीलाताई मोराळे, माजी आमदार सय्यद सलीम यांच्यासह

◀◀ पान ३ वर

# आण्णांच्या नेतृत्वाखाली पंकजाताई मुंडेना मताधिक्य देण्यासाठी कामा लागा- शिवराज पवार

### तलवडा येथे शिवराज पवार यांच्या उपस्थितीत भाजपाची बैठक संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

साल स.न. २०१४ पासुन आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघातील कायापालट करत दळणवळणाचा मार्ग सुकर केला आहे कारण गेली दहा वर्षांपासून देशात पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांचे सरकार होते तर महाराष्ट्रात महायुतीचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन पालकमंत्री पंकजाताई मुंडे तर विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून आ.लक्ष्मण



आण्णांनी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन बागपिंपळगाव,तलवडा ते टाकरवन रस्ता असो किवा शनिचे राक्षसभुवनचा रस्ता असो तर पाचेगाव ते कुक्कडगाव रस्त्याचे काम सुरु आहे तसेच चंकलंबा,पाढरवाडी,गेवराई रस्त्याचे सुध्दा काम सुरु आहे हे सगळ पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्यामुळेच शक्य झाले आहे त्यामुळे नरेंद्रभाई मोदी यांना तिस-यांदा पंतप्रधान करण्यासाठी आ.लक्ष्मण

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलिसांवर हल्ला; चौघांना १० वर्षे सक्तमजूरी

**पुणे । प्रतिनिधी**

खुनाच्या गुन्ह्यात अटकेत असताना खिडकीचे गज कापून पळून जाणार्या आरोपींना पकडण्यासाठी आलेल्या पोलिसांवर प्राणघातक हल्ला करणार्या चौघांना जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा शुक्रवारी (दि. ३) सुनावली. विनोद सुभाष जाधव (वय ४१),आबासाहेब बाबासाहेब लांडगे (वय ४० दोघेही रा. राहता, जि. अहमदनगर), सलीम ऊर्फ पाप्या ख्याजा शेख (वय ४६), सागर शिवाजी काळे (वय ३१, दोघेही रा. कालिकानगर, शिर्डी, जि. अहमदनगर) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत.



शिर्डी पोलिस ठाण्यांतर्गत खुनाच्या गुन्ह्यात आरोपी असलेले विनोद जाधव,आबासाहेब लांडगे, सलीम ऊर्फ पाप्या शेख, सागर काळे हे पोलिस कोठडीत असताना २८ एप्रिल २०१४ रोजी रात्री खिडकीचे गज कापून फरार झाले होते. गुप्त खबर्यांच्या माहितीनुसार ते मंचर (ता. आंबेगाव) पोलिस ठाण्याच्या हद्दीत असल्याची माहिती शिर्डी पोलिसांना मिळाली. त्यानुसार शिर्डी पोलिसांचे पथक आरोपींना पकडण्यासाठी मंचर हद्दीत आले. शिर्डी व मंचर पोलिसांनी आरोपींचा माग काढला. १ मे २०१४ रोजी हे आरोपी गावडेवाडी - वाफगाव रस्त्याने पोलिसांना गुंगारा देत पळून जात होते. त्यांना पोलिसांनी शरण येण्यास सांगितले. मात्र, ते पुढे जाऊ लागले.त्यांना पकडण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला असता ते दुचाकी (एमएच १७ एएच ७३१९) वरून पळून जाऊ लागले. पोलिस आडवे आले असता त्यांनी दुचाकी पोलिसांच्या अंगावर घालून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पोलिसांवर दगडफेकही केली. यामध्ये काही पोलिस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. तरीही पोलिसानी त्यांना पकडले. आरोपी सलीम ऊर्फ पाप्या शेख याच्याकडून एक गावठी कट्टा आणि २ जिवंत काडतुसे हस्तगत केली. शिर्डी ठाण्याचे जखमी पोलिस निरीक्षक संपत भोसले यांनी मंचर ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास मंचर पोलिस ठाण्याचे निरीक्षक मोहन जाधव यांनी केला. हा खटला राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात सुरू होता. त्याचा निकाल शुक्रवारी मुख्य न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी दिला. सरकारी पक्षाच्या वतीने सहायक अभियोक्ता मिलिंद पांडकर यांनी आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी असा युक्तिवाद केला. प्रत्यक्षदर्शी पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी आरोपींना १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. या खटल्याचे न्यायालयातील पोलिस कामकाज हवालदार सुनीता बटवाल यांनी पाहिले.

# असदुद्दीन ओवेसी पुण्यात सभा घेणार

## ७ मे रोजी 'एमआयएम'ची पुण्यातील ताकद दिसणार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडी, महायुती आणि वंचितच्या उमेदवारासह ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लीमीन म्हणजेच एमआयएमचे अनीस सुंडके निवडणूक रिंगणात आहेत. सुंडके यांच्या प्रचारासाठी एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांची ७ मे रोजी पुण्यात सभा होणार आहे. मात्र, सभेचे ठिकाण अद्याप ठरलेले नाही, अशी माहिती अनीस सुंडके यांनी दिली. ते एका वृत्तपत्राला मुलाखत देताना बोलत होते.



अनीस सुंडके म्हणाले, आगामी विधानसभा, महापालिका निवडणुकांसाठी आतापासूनच आम्ही कामाला लागलो आहोत. पुणे शहरात एमआयएमचा एक आमदार आणि महापालिकेत ३० नगरसेवक निवडून आणण्याचे एमआयएमचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांशी चर्चा सुरू आहे. अनीस सुंडके पुढे म्हणाले, एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी विश्वासाने मला लोकसभा निवडणुकीची उमेदवारी दिली. मुस्लिम मतांचा वापर फक्त निवडणुकीसाठी केला जातो. मुस्लिम समाजातील प्रश्न, समस्या, शिक्षण, बेरोजगारी अशा मूलभूत बाबींकडे दुर्लक्ष केले जाते, अशी खंत सुंडके यांनी व्यक्त केला. काँग्रेसवर आरोप करताना अनीस सुंडके म्हणाले, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसने मुस्लिम कायकर्ते आणि समाजाचा वापर फक्त राजकारणासाठी केला. मुस्लिम समाजाच्या मागण्यांकडे नेहमीच दुर्लक्ष केले. एकीकडे काँग्रेस, राष्ट्रवादीवर टीका करताना सुंडके यांनी असेही म्हटले की, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसने मला कामाची संधी दिली. नगरसेवक, स्थायी समितीचा अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी या पक्षांनी मला दिली. त्यावेळी मी कायम जातधर्माच्या पलीकडे जाऊन काम केले. सुंडके म्हणाले, स्थायी समिती अध्यक्ष असताना पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरासाठी जागा मंजूर करण्यात आली. भवानी पेठेतील रफी अहमद किडवाई शाळा बांधण्यात आली, असे सुंडके म्हणाले.

# आईच्या हत्येप्रकरणी मुलास जन्मठेपेची शिक्षा

**बारामती । प्रतिनिधी**

आईच्या हत्येप्रकरणी संदीप वेताळ मिसाळ (वय ३५, रा. भोगवस्ती, काटी, ता. इंदापूर) याला येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश जे. पी. दरेकर यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. दि. २४ जुलै २०१४ रोजी काटी येथील भोंगवस्ती येथे ही घटना घडली होती.

आई कलावती वेताळ मिसाळ यांची हत्या केल्याचा आरोप त्याच्यावर होता. या प्रकरणी प्रदीप वेताळ मिसाळ याने फिर्याद दिली होती. संदीप हा काहीही कामधंदा करत नसल्याने आईसोबत त्याचे वादविवाद होत असत. घटनेदिवशी प्रदीप हा सकाळी इंदापूर येथे महाविद्यालयात गेला. त्यावेळी आई व संदीप हे दोघेच घरी होते. प्रदीप हा दुपारी दीडच्या सुमारास घरी आला. तेव्हा संदीप घराबाहेर खुर्चीवर बसला होता. त्याच्या कपड्यावर रक्ताचे डाग होते. प्रदीप याने संदीप यास आईला काय झाले, अशी विचारणा केली. त्यावर त्याने आईला कोणी तरी मारल्याचे सांगितले. प्रदीप याने नातेवाईक, शेजारी यांना बोलावून घरी कोणी आले होते का, याची खातरजमा केली. परंतु, या कालावधीत घरी कोणीही



आले नसल्याचे दिसून आले. त्यावर संदीप यानेच ही घटना केल्याचे त्याच्या लक्षात आले. इंदापूर पोलिसांनी त्याच्याविरोधात खूनाचा गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन सहाय्यक पोलिस निरीक्षक पी. व्ही. काळे यांनी या प्रकरणाचा तपास केला. तपासामध्ये संदीप याने आई कलावती हिला कुदळीने मारहाण केली. कुऱ्हाडीने डोक्यात, तोंडावर, कपाळावर सपासप वार केले होते. तसेच घरातील रक्त पुसून पुरावा नष्ट केल्याचे समोर आले होते.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील प्रसन्न जोशी यांनी काम पाहिले. त्यांनी आठ साक्षीदार तपासले. त्यामध्ये डॉ. नामदेव गार्डे यांचा न्याय वैद्यकीय पुरावा महत्त्वाचा ठरला. इतर साक्षीदारांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. हा खटला परिस्थितीजन्य पुरावा व वैद्यकीय पुराव्यावर आधारित होता. ॲड. जोशी यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायाधिश दरेकर यांनी संदीप मिसाळ याला खून प्रकरणी जन्मठेप व एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. पुरावा नष्ट केल्याप्रकरणी तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. या खटल्यामध्ये सरकार पक्षाला इंदापूरचे पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार मयुर गायकवाड, सहाय्यक फौजदार एन. ए. नलवडे यांनी सहकार्य केले.

# रेल्वेत डल्ला मारणाऱ्या 'साहसी गँग'च्या दोघांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

रेल्वेमधून प्रवास करणार्या प्रवाशाच्या सामानातील ४७ ग्रॅम सोन्यासह रोख रक्कम चोरणार्या दोघांना रेल्वे सुरक्षा बलाचे जवान आणि लोहमार्ग पोलिसांनी रेल्वेतून पळून जाताना पुणे रेल्वे स्थानकाच्या यार्डात मोठ्या शिताफीने पकडले. हे दोघे तिरूचिरापल्ली-अहमदाबाद एक्सप्रेसमधून उतरून रिक्षाने पळून जाण्याच्या तयारीत होते.




रेल्वेमध्ये प्रवाशांच्या सामानाच्या आणि त्यातील मौल्यवान वस्तू, मोबाईल चोरीच्या घटना अलीकडील काळात वाढत आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांकडून प्रवाशांना प्रवास करताना मौल्यवान वस्तु जवळ न बाळगण्याचे आवाहन केले जात आहे. मात्र, काही अडचणींमुळे प्रवाशांना मौल्यवान वस्तु सोबत घेऊन प्रवास करावा लागत आहे. परिणामी, रेल्वे प्रवाशांचा प्रवास असुरक्षित बनला आहे. तरी सुरक्षा यंत्रणांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

रेल्वे सुरक्षा बलाने दिलेल्या माहितीनुसार, वरिष्ठ रेल्वे सुरक्षा आयुक्त प्रियंका शर्मा, आरपीएफ निरीक्षक सुधीरकुमार मिश्रा, सुनील कुमार यादव, उप निरीक्षक मुकेश कुमार सक्सेना यांच्या मार्गदर्शनाखाली जवान संतोष गायकवाड, गोविंद पर्गे, बाप्पू सोनावणे, विशाल माने, युवराज गायकवाड, सय्यद रसूल हे पुणे रेल्वे स्थानकावर रेल्वे गाड्यांमध्ये गस्तीवर होते.

इतक्यात स्थानकावर तिरूचिरापल्ली-अहमदाबाद एक्सप्रेस (विशेष) आली. त्या गाडीतून उतरून दोघेजण पळताना आरपीएफ जवानांना दिसले. हे दोघेजन यार्डातून निघून रिक्षा पकडत असताना त्यांना पकडले. आणि पुढील कारवाईसाठी लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात दिले. यावेळी केलेल्या अधिक तपासादरम्यान त्यांच्याकडून एकूण ४ लाख ५७ हजार ५५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात ४७ ग्रॅम सोने आणि २८ हजार रूपये रोख रक्कम आढळली. संबंधित दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कार्यवाही लोहमार्ग पोलिसांकडून केली जात आहे.

याबाबत आरपीएफ अधिकारी म्हणाले, अटक केलेले दोघेजण प्रसिध्द साहसी गँगचे आहेत. नवीन कुमार फुलचंद साहसी (वय ३१, औरंगनगर, हरयाणा) आणि किशोर जयसिंग मित्तल (वय ४८, मोखरा, हरयाणा) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला असून, पुढील कार्यवाहीसाठी लोहमार्ग पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. अशा अनुचित घटना टाळण्यासाठी प्रवाशांनी प्रवास करताना बॅगाची काळजी घ्यावी, तसेच, प्रवासादरम्यान मौल्यवान वस्तु सोबत बाळगणे टाळावे.

# विभागीय भरारी पथकाद्वारे ८६ हजार ३५९ किंमतीचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथकाद्वारे जिल्ह्यातील गेल्या चार दिवसात हवेली तालुक्यात डुडुळगाव, वाघोली, शिंदवणे, उंड्री परिसरात अवैध गावठी हातभट्टी दारु निर्मीती, विक्री, तसेच अवैधरित्या मद्य विक्री करणाऱ्यांवर छापे मारुन ८६ हजार ३५९ किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.



जिल्ह्यात विभागाच्यावतीने अवैध दारु निर्मीती, वाहतुक व विक्रीवर आळा घालण्याच्या दृष्टीने १ ते ४ मे या कालावधीत विशेष मोहिम आखून विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्कामार्फत जिल्ह्यात ढाब्यांवर छापे मारुन ६ वारस व २ बेवारस असे एकुण ८ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सदर गुन्हयांमध्ये एकुण १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्हयांत एकूण १६ लि. देशी दारु, ८ लि. विदेशी मद्य, १८ लि. बिअर तसेच गावठी हातभट्टी दारु २६ लिटर व १ हजार ८०० लिटर गावठी हातभट्टी दारु निमिर्तीचे रसायन मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये दुय्यम निरीक्षक ए. बी. पाटील, व्ही. एम. माने, जवान ए. आर. थोरात, पी. टी. कदम, एस.एस.पोंधे, एस.सी. भाट व आर.टी. ताराळकर यांनी सहभाग घेतला आहे. यापुढेही अशाच प्रकारे मोहिमा राबवून अवैध दारु व्यवसायावर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक नरेंद्र थोरात यांनी दिली आहे.

# राज्य उत्पादन शुल्कच्या छाप्यात म्हाळुंगे येथे गावठी दारुसह २ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**पुणे । प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या पथकाने गोपनीय माहिती मिळाल्यानुसार म्हाळुंगे गावाच्या हद्दीत टाकलेल्या छाप्यात गावठी दारुसह सोनेरी रंगाची सॅन्ट्रो कार असा २ लाख ६८ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या छाप्यात अंदाजे २ लाख २५ हजार रुपयांच्या सॅन्ट्रो कारमध्ये ३५ लीटर क्षमतेच्या १२ प्लास्टीक कॅनमध्ये अंदाजे ४३ हजार २०० रुपये किंमतीची दारु असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यामधील फरार आरोपीचा शोध सूरू असून आरोपी विरूद्ध मुंबई दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (ए)(ई) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. निरीक्षक सचिन श्रीवास्तव पुढील तपास करीत आहेत. ही कारवाई डी विभागाचे निरीक्षक सचिन श्रीवास्तव, दुय्यम निरीक्षक विजय सूर्यवंशी, शीतल देशमुख, सागर ध्रुवे जवान संजय गोरे, राजू पोटे, शुभम मुंढे व वाहन चालक राऊत यांच्या पथकाने पार पाडली.

# बारामती लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी तयारी पूर्ण - निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी

**बारामती । प्रतिनिधी**

जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात बारामती लोकसभा मतदासंघाकरीता मंगळवार ७ मे रोजी मतदान होत असून मतदानाच्यादृष्टीने मतदार संघातील सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी दिली आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघात दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर व खडकवासला असे एकूण सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. दौंड विधानसभा मतदासंघात ३ लाख ४ हजार ६०७, इंदापूर ३ लाख २३ हजार ५४१, बारामती ३ लाख ६९ हजार २१७, पुरंदर ४ लाख २९ हजार ३५१, भोर ४ लाख ७ हजार ९२१ व खडकवासला ५ लाख ३८ हजार ३१ असे एकूण मतदार २३ लाख ७२ हजार ६६८ मतदार आहेत.

बारामती विधानसभा मतदारसंघात ३८० मतदान केंद्र, पुरंदर ४२१, इंदापूर ३३०, दौंड ३०९, भोर एकूण ५६१ व खडकवासला विधानसभा मतदारसंघात ४६५ मतदान केंद्र आहेत. ५ व ५ पेक्षा अधिक मतदान केंद्र असलेले दौंड विधानसभा मतदारसंघात ६, इंदापूर ५, बारामती ६, पुरंदर १७, भोर ९ व खडकवासला ४४ असे एकूण ८७ मतदान केंद्रे आहेत.

दौंड विधानसभा मतदासंघात २ हजार ५९७, इंदापूर २ हजार ५१८, बारामती ३ लाख ५००, पुरंदर ३ हजार ३७७, भोर ४ हजार ६२ व खडकवासला मतदार संघासाठी ४ हजार ४९ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतदारसंघनिहाय निवडणुकीच्या अनुषंगाने साहित्याचे ६ मे रोजी वितरण करण्यात येणार असून दौंड विधानसभा मतदासंघाकरीता शासकीय धान्य गोदाम, मदर तेरेसा चौक, नगरमोरी दौंड, इंदापूर विधानसभा मतदारसंघाकरीता शासकीय धान्य गोदाम कालठण रोड, इंदापूर, बारामती विधानसभा मतदारसंघाकरीता महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ महाराष्ट्र राज्य औद्योगिक वसाहत महामंडळ परिसर, बारामती, पुरंदर विधानसभाकरीता श्री कातोबा हायस्कूल दिवे, भोर मतदारसंघात भोर तालुक्याकरीता औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोर आणि वेल्हे तालुक्याकरीता जुनी पंचायत समिती, वेल्हे व जिल्हा परिषद मध्यवर्ती शाळा कुरण खुर्द, मुळशी तालुक्याकरीता राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा कासार आंबोली, आणि खडकवासला मतदारसंघाकरीता स्प्रिंग डेल प्ले ग्रांऊड वडगाव बु. ता. हवेली येथून वितरण करण्यात येणार आहे, अशी माहितीदेखील निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती द्विवेदी यांनी दिली आहे.

# बॉईज स्पोर्ट्स कंपनी नाशिक रोड कॅम्प येथे तायक्वांदो खेळाडू मुलांच्या निवडीसाठी प्रेरणा रॅलीचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

बॉईज स्पोर्ट्स कंपनी, आर्टिलरी सेंटर, नाशिकरोड कॅम्प येथे १७ ते १९ मे या कालावधीत तायक्वांदो क्रीडा प्रकारातील साधारण आणि सिद्ध खेळाडूंची स्पोर्ट्स कॅडेट म्हणून प्रशिक्षणास निवड करण्यासाठी प्रेरणा रॅलीचे आयोजन करण्यात येणार असून पुणे जिल्ह्यातील तायक्वांदो खेळाडूंना संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बॉईज स्पोर्ट्स कंपनी, आर्टिलरी सेंटर नाशिक रोड कॅम्प हा स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया आणि भारतीय लष्कर यांच्यातील संयुक्त उपक्रम आहे. या रॅलीत क्रीडा शाखेतील निवड चाचण्या, शारीरिक आणि तांत्रिक कौशल्य चाचणी भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे प्रशिक्षक आणि अधिकारी मंडळाच्या अंतर्गत घेतली जाईल. संरक्षण मंत्रालय (लष्कर), भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या एकात्मिक मुख्यालयाने मंजूर करेपर्यंत ही निवड तात्पुरती राहील. अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर निवडलेल्या कॅडेट्सना प्रशिक्षणासाठी बोलावले जाईल.

खेळाडूंचे वय १७ मे २०२४ रोजी ८ ते १४ वर्षे दरम्यान (जन्म १७ मे २००८ ते १७ मे २०१४ दरम्यान) असावे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेत्यांच्या अपवादात्मक उल्लेखनीय प्रकरणांमध्ये कमाल वयोमर्यादा १६ वर्षांपर्यंत राहिल. वयानुसार उंची व वजनाचे मापदंड राहतील. शारीरिक मापदंडामध्ये कोणतीही कमतरता सामान्यतः स्वीकारली जाणार नाही. तथापि, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रे किंवा पदके असलेल्या अपवादात्मक प्रतिभावान मुलांच्या बाबतीत उंची आणि वजनाचे निकष शिथिल केले जातील. वैद्यकीय तपासणी वैद्यकीय स्पोर्ट्स मेडिसीन सेंटरच्या तज्ज्ञ अधिकाऱ्याकडून केली जाईल.

खेळाडूंचा जन्माचा दाखला, शैक्षणिक प्रमाणपत्र, शाळेतून किंवा सरपंच यांनी दिलेले चारित्र्य प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्राच्या मूळ प्रती, जिल्ह्यातील क्रीडा सहभाग, पदक प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती आणि ज्या पातळीवर खेळ खेळले आहेत त्या पातळीवरील मूळ प्रमाणपत्रे उमेदवाराला सादर करावी लागतील. त्याचबरोबर सहा रंगीत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र व अर्जासोबत साक्षांकित केलेली प्रमाणपत्राची एक प्रत जमा करावी लागेल.

निवडलेल्या उमेदवारांना बॉईज स्पोर्ट्स कंपनीकडून बोर्डिंग व लॉजिंग, सहावी ते दहावीपर्यंतची इंग्रजी माध्यमाची पुस्तके, स्टेशनरी, वर्षातून एकदा पूर्ण स्पोर्ट किट, पूर्ण भारतात स्पर्धा प्रदर्शनासाठीचा खर्च आदी सुविधा मोफत पुरविण्यात येतील. त्याचबरोबर वैद्यकीय आणि अपघात विमा संरक्षण दिले जाईल. उमेदवार १० वी उत्तीर्ण झाल्यावर आणि १७ वर्षे वय झाल्यावर, सर्व अटी आणि शर्तीनुसार सैन्यात नावनोंदणीसाठी लागू असलेल्या अंतिम निवड प्रक्रियेत उमेदवाराचे नाव दिले जाईल. कोणत्याही कारणास्तव सैन्यात नावनोंदणी होऊ न शकल्यास अशा मुलांचे पालक मुलांवर शासनाने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास जवाबदार असतील. निवडलेल्या मुलांच्या पालकांनी यासाठी बिगर न्यायालयीन मुद्रांक कागदावर हमीपत्र देणे आवश्यक आहे.

प्रेरणा रॅलीच्या कालावधीत जेवण आणि राहण्याचा खर्च उमेदवारांनी स्वत: करणे आवश्यक आहे. चाळणीद्वारे निवड कालावधीत, उमेदवार आणि त्यांच्यासोबत आलेल्या व्यक्तींनी नाशिक येथे त्यांच्या राहण्याची व वाहतुकीची व्यवस्था स्वतः करावी. रॅलीच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान उमेदवारांसोवत कोणत्याही महिलांना परवानगी दिली जाणार नाही.

नोंदणीसाठी उमेदवारांनी आर्टीलरी सेंटर, नाशिक रोड कॅम्प येथे १७ मे रोजी सकाळी ७ नंतर उपस्थित रहावे. संपूर्ण निवड प्रक्रिया तीन दिवसांत पार पाडण्याची शक्यता आहे. निवड प्रगतीशील टप्प्यात होईल. जे उमेदवार कोणत्याही टप्प्यावर योग्य नाहीत त्यांना निवड चाचणीच्या पुढील टप्प्यात सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. निवड झालेल्या मुलांना निवड चाचणीच्या तारखेपासून ३ ते ६ महिन्यांच्या आत बीएससी, आर्टिलरी सेंटर, नाशिकरोड कॅम्पमध्ये रूजू होण्यासाठी एसआयए कडून योग्य मान्यता मिळाल्यानंतर निश्चित तारीख नंतर कळविण्यात येईल.

अधिक माहितीसाठी ऑफिसर कमांडिंग आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनी, आर्टिलरी सेंटर, नाशिक रोड कॅम्प पिन - ९०८८०० द्वारा ५६ एपीओ येथे किंवा तायक्वांदो प्रशिक्षक भ्रमणध्वनी क्रमाक ७००५०५३८८२ वर संपर्क साधावा. या रॅलीकरिताचे अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे उपलब्ध आहेत, असेही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि). यांनी कळविले आहे.

# भिगवण भागातील प्रश्न सोडविण्यासाठी ही निवडणूक महत्वाची- अजित पवार



**भिगवण । प्रतिनिधी**

भिगवण व परिसरातील शेतीच्या, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, तलाव, बुडीत बंधारे पाणी प्रश्न, मच्छीमार प्रश्न यांसह इतर प्रश्न सोडवायचे असतील, तर ही निवडणूक महत्त्वाची असल्याचे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त करून आम्ही सर्वजण परिसराचा विकास व कायापालट करण्यासाठी एकत्र आलो आहे. मात्र, काहींना आमच्यात कुरघोड्या करायच्या असल्याने ते नाराज आहेत, अशी टीकाही त्यांनी या वेळी केली. बारामती लोकसभा निवडणुकीच्या महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ भिगवण येथे घेण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते. या वेळी राष्ट्रीय साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील,आमदार दत्तात्रय भरणे,यशवंत माने,माजी मंत्री सदाभाऊ खोत,अंकिता पाटील आदीजण उपस्थित होते.

पवार म्हणाले की, या भागात पर्यटन विकासाल वाव आहे, त्याकरिता हर्षवर्धन भाऊ व भरणे मामांनी पाठपुरावा करण्याची विनंती केली. रेल्वेच्या थांब्याबाबत आपण केंद्रीय मंत्र्यांशी बोलून प्रश्न निकाली काढू,आचारसंहिता संपल्यावर येथील बसस्थानक दुरुस्ती किंवा नव्याने उभारणी करण्यात येईल, जेणेकरून रात्री-अपरात्री महिलांना सुरक्षित वाटेल. या भागातील मदनवाडी,पोंधवडी आदी तलाव वरदान असले, तरी सतत तहानलेले असतात. त्याबाबत सकारात्मक विचार करणार आहे. या भागात बुडीत बंधारे उभारण्यात येतील तसेच भोई समाजाचा रोजगार लक्षात घेऊन उजनीत मत्स्यबीज सोडण्यात आले आहे. गेल्या वर्षी हे बीज उशिरा सुटले असले, तरी चालू वर्षी त्याचे नियोजन करून मत्स्यबीज सोडले जाईल.